CMYK

दैनिक आरभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

■ www.arambhmarathi.com ■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 266 ■ शनिवार,06डिसेंबर 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5 ■ epaper.arambhmarathi.com






महायुती सरकारने वर्षभरात धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला गती दिली

पेज 3

# नगर पालिकेच्याच गलथानपणामुळे धाराशिवमध्ये घसरले मतदान

## निष्क्रीय अधिकाऱ्यांच्या जीवावर पालिकेची निवडणूक प्रक्रिया, हजारो मतदार हक्कापासून वंचित

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरात यंदाच्या नगरपरिषद निवडणुकीत सर्वात कमी मतदानाची नोंद झाली असून, यामागील मुख्य कारण निवडणूक विभाग आणि नगरपरिषद प्रशासनाचा अनियंत्रित कारभार असल्याचे उघड झाले आहे. प्रभाग सोडून भलत्याच ठिकाणी मतदारांची नावे, विस्कळीत यादी, चुकीचे पत्ते, गायब नावे, या सर्व गोंधळाने हजारो मतदार मतदानापासून वंचित राहिले.परिणामी नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. नगरपालिकेच्या इतिहासात कधी नव्हे इतका स्वैराचार आणि भ्रष्ट कारभार पाहायला मिळत आहे. 2022 मध्ये प्रभागरचना आणि मतदार याद्यांचे काम जवळपास पूर्ण झाले होते. त्यावेळी आलेल्या दुरुस्ती सूचनाही नोंदवण्यात आल्या होत्या. पण निवडणूक पुढे ढकलल्यानंतर 2025 मध्ये नव्या अपडेटच्या नावाखाली प्रचंड गोंधळ निर्माण झाला. आधीच दुरुस्त केलेल्या नावांचा 'डंप डेटा' एका प्रभागातून दुसऱ्यात हलवण्यात





आल्याने याद्यांचा विचका झाला. चुकांबद्दल माहिती देऊनही निवडणूक विभाग आणि पालिका अधिकाऱ्यांनी हा प्रकार गांभीर्याने घेतलाच नाही किंवा त्यांना कुणाच्या तरी इशाऱ्यावर नाचायचे होते. यामुळे प्रभाग 5 मधील मतदारांची नावे प्रभाग 6, 7, 8, 9 अशा ठिकाणी फेकली गेली. किंवा 'बार्शी नाका' पत्ता असलेल्या मतदारांना थेट तेरणा महाविद्यालयात मतदानासाठी जावे लागले, तर शेकडोंची नावे यादीतून गायब झाली. काहींची नावे दोनदा–तिनदा तर काहींची नावेच यादीत नव्हती. दोन ते तीन किलोमीटर दूर मतदान केंद्रावर जाण्याचा त्रास टाळण्यासाठी अनेकांनी मतदानाकडे पाठ फिरवली आणि मतदानाचा टक्का घसरला. धाराशिव शहरातील मतदारांना वंचित ठेवण्याचा हा संघटित प्रकार काही भ्रष्ट प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांच्या हातून केल्याचा संशय नागरिकांमधून व्यक्त होत आहे. लोकशाहीच्या पवित्र प्रक्रियेला तडा देणाऱ्या या गलथानपणाबद्दल दोषी अधिकारी–कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का? मतदारांच्या अधिकाराची पायमल्ली करणाऱ्यांना जबाबदार धरणार कोण? आणि मतदान वाढवण्याचा आव आणणाऱ्या निवडणूक विभागाने नेमकं साध्य तरी काय केलं ?,असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

### कुचकामी प्रशासन निष्क्रीय अधिकारी आणि अनियंत्रित कारभार

धाराशिव पालिकेच्या एकूणच प्रक्रियेत अधिकाऱ्यांची भूमिका कुचकामी दिसत आहे. उमेदवारांना ताटकळत ठेवणे, समाधानकारक माहिती न देणे, प्रसारमाध्यमांना महत्व न देणे,असे प्रकार नगर पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सुरू होते. पालिकेच्या प्रमुख नीता अंधारे यांच्याकडून फोनला प्रतिसाद मिळत नाही. राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नेत्यांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत अनेकवेळा तक्रार केली.मात्र,लोकांच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे नसलेल्या अशा अधिकाऱ्यांनी पालिकेची दुर्दशा करून टाकली आहे. यापूर्वीच्या वसुधा फड यांनीही याच पद्धतीने कारभार हाकला.जागरूक लोकांच्या संपर्कात नसल्यानंतर तसेच लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप नसल्यानंतर पालिकेत काहीही करता येते,याच मानसिकतेतून सध्या कारभार सुरू आहे.

# 10 लाखांची खंडणी मागितली; न दिल्यास कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी




**आरंभ मराठी । परंडा**

परंडा शहरातील कुर्डवाडी रोड येथे राहणाऱ्या 69 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाकडे दोन आरोपींनी 10 लाख रुपयांची खंडणी मागून रक्कम न दिल्यास कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दीपक द्वारकाप्रसाद तिवारी (वय 69) यांना आरोपी अमर दयानंद तिवारी व आनंद दयानंद तिवारी (दोघे रा. शिक्षक सोसायटी, परंडा) यांनी वारंवार फोन करून, आम्ही आर्थिक अडचणीत आहोत असे सांगत रु. 10,00,000 इतकी खंडणी मागितली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यावर आरोपींनी फिर्यादीच्या घरातील मुलगा, मुलगी व सुन यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. ही घटना 11 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी 7.30 वाजता सर्वे नं. 45, कुर्डवाडी रोड, परंडा येथे घडली. त्यानंतर फिर्यादीने 4 डिसेंबर 2025 रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. फिर्यादीच्या प्रथम खबरीवरून परंडा पोलीसांनी नमूद आरोपींवर भा.दं.वि. कलम 33, 308(2)(4), 351(2)(4), 3(5) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास परंडा पोलीस ठाण्याचे पथक करीत आहे

# शिक्षकांचे विविध मागण्यांसाठी काळ्याफिती लावून आंदोलन; मागण्यांचे मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र राज्य सर्व शिक्षक संघटना समन्वय संघ यांच्या वतीने राज्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व शाळांवरील अन्यायकारक धोरणांविरोधात शुक्रवारी (दि.५) राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात आले. धाराशिव शहरात आचारसंहिता लागू असल्यामुळे येथील शिक्षकांनी आक्रोश मोर्चा काढण्याऐवजी काळ्या फिती लावून कामकाज करत आपला निषेध नोंदवला. संघटनेने निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले. या निवेदनात शासनाच्या अलीकडील शिक्षण धोरणांचा ग्रामीण शिक्षण व्यवस्था, जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिका व अनुदानित शाळांवर होणारा प्रतिकूल परिणाम स्पष्ट करण्यात आला आहे. यावेळी निवेदनात सन २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टेट मधून सूट द्यावी,१५ मार्च २०२४ चा शिक्षक संच मान्यतेवरील निर्णय रद्द करावा, १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांसाठी १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करावी, अशैक्षणिक व ऑनलाईन कामातून शिक्षकांची सुटका करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करावी, वस्तीशाळा शिक्षकांची सेवा मूळ दिनांकापासून ग्राह्य धरावी, अंशतः अनुदानित शाळांना तात्काळ अनुदान, पटसंख्या अभावी शाळा बंद न करण्याची मागणी या मागण्यांचा समावेश निवेदनात करण्यात आला आहे. या मागण्यांसाठी राज्यातील सर्व शिक्षकांनी सामूहिक रजा घेवून हा निषेध नोंदविला असून शासनाने सर्व मागण्यांवर त्वरित निर्णय घ्यावा, विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना न्याय द्यावा अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर बाळकृष्ण तांबारे, विलास कंटेकुरे, सोमनाथ टकले, कल्याण वेताळे, संतोष देशपांडे, रमेश बारस्कर, प्रशांत माने, बालाजी तांबे यांच्यासह धाराशिव जिल्हा सर्व शिक्षक महासंघातील शिक्षकांच्या स्वाक्षरी आहेत.




# 31 डिसेंबरपूर्वी ग्रामपंचायत कराचा भरणा केल्यास करामध्ये 50 टक्के सूट मिळणार

## शासनाच्या आदेशामुळे थकबाकी भरण्यास गती मिळणार

**आरंभ मराठी। तेर**

गावांचा आर्थिक कणा बळकट करण्यासाठी आणि ग्रामपंचायतींची कर वसुलीची मोहीम प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार, ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील निवासी मालमत्ता कर थकबाकीवर ५० टक्कयापर्यंत सवलत देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यानुसार थकबाकीदारांनी या कर सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या निर्णयामुळे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'ला मोठी गती मिळणार असून, थकबाकीदार ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने या संदर्भात नवीन अध्यादेश जारी केला. यात थकबाकीच्या मूळ रकमेवर ५० टक्क्यांपर्यंत सवलत मिळेल. ही सवलत फक्त निवासी मालमत्ताधारकांसाठी लागू असेल. मालमत्ता कर (घरपट्टी), पाणीपट्टी इत्यादी करांच्या थकबाकीवर ही सवलत मिळेल. संबंधित मालमत्ताधारकाने चालू वर्षाच्या कराची संपूर्ण रक्कम आणि १ एप्रिल, २०२५ पूर्वीच्या एकूण थकबाकीच्या ५० टक्के रक्कम 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'च्या अंमलबजावणीच्या कालावधीत एकरकमी ३१ डिसेबर पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीला त्यांच्या कार्यक्षेत्रातील थकबाकीदारांना वरीलप्रमाणे सवलत देण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. ग्रामपंचायतींचे आर्थिक स्वावलंबन हे समृद्ध गावांच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे. मात्र, अनेक ग्रामपंचायतींमध्ये करवसुली मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने विकासकामांना खीळ बसत होती. या पार्श्वभूमीवर, थकबाकीदारांना आकर्षक सवलत देऊन जास्त कर वसुलीसाठी शासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यामुळे ग्रामपंचायतींना नागरिकांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी आणि नवीन विकास कामे हाती घेण्यासाठी मोठा निधी उपलब्ध होणार आहे. हा निर्णय राज्यातील सर्व ग्रामपंचायतीत लागू राहणार असल्याने, मोठ्या संख्येने ग्रामस्थ या सवलतीचा लाभ घेऊन कर भरण्यास प्रवृत्त होण्याची शक्यता आहे.

### निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना होणार फायदा

आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुक उमेदवारांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या उमेदवाराला निवडणुकीपूर्वी संपूर्ण थकबाकी भरावी लागते. ही थकबाकी हजारोच्या घरात असते अशावेळी पन्नास टक्क्यांची सवलत मिळत असल्यामुळे त्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न अनेकांकडून केला जाईल.

# तामलवाडी पोलिसांकडून 97 हजारांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; एकावर गुन्हा दाखल

**आरंभ मराठी । तामलवाडी**

महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या गुटख्याचा साठा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्या एका व्यक्तीवर तामलवाडी पोलिसांनी कारवाई करत गुन्हा नोंदवला आहे. या कारवाईत तब्बल 97,140 रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटख्याचा माल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश नागनाथ गंजे (रा. गंजेवाडी, ता. तुळजापूर) याने आपल्या राहत्या घरी मोठ्या प्रमाणात बंदी असलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ साठवून ठेवले असल्याची गोपनीय माहिती तामलवाडी पोलीस ठाण्याला प्राप्त झाली होती. त्यानुसार दिनांक 4 डिसेंबर 2025 रोजी सायंकाळी पोलिसांच्या पथकाने गंजेवाडी येथील घरावर छापा टाकला. यावेळी पोलिसांना डायरेक्टर पान मसाला, प्रीमियम टोबॅको, विमल पान मसाला, V-1 तंबाखू असे विविध प्रकारचे गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळले. सर्व साहित्य जप्त करण्यात आले असून त्याची एकूण किंमत 97,140 रुपये इतकी आहे. घटनेप्रकरणी आरोपी रमेश नागनाथ गंजे यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम 123, 223, 274, 275 तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 मधील संबंधित कलमान्वये तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरंभ मराठी

## शैक्षणिक परिसरामुळे टवाळखोरी कायम, वाहतुकीचा खेळखंडोबा

# जिजाऊ चौक पोलिस चौकी बनली शोभेची टपरी; फक्त रेकॉर्डला चार कर्मचारी, चौकी कायम कुलूपबंद

**आरंभ मराठी । धाराशिव**

शाळा, महाविद्यालयीन परिसर असलेल्या आणि मुली-महिलांची छेडछाड, हाणामारीच्या घटना सातत्याने घडणाऱ्या शहरातील जिजाऊ चौक भागात मोठ्या प्रयत्नाने पोलिस चौकी मंजूर करण्यात आली. पोलिस चौकीमुळे या भागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मदत होईल अशी अपेक्षा होती. मात्र, ही पोलिस चौकी सध्या शोभेची बाहुली बनली आहे. पोलिस चौकीमध्ये चोवीस तास पोलिस कर्मचारी उपस्थित असणे अपेक्षित असताना केवळ रेकॉर्डवर चार पोलिस कर्मचारी उपस्थित असतात प्रत्यक्षात मात्र पोलिस चौकीमध्ये एकही कर्मचारी उपस्थित नसतो. त्यामुळे या पोलिस चौकीचा नेमका उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरातील जिजाऊ चौक हा शैक्षणिक परिसर असून, या भागात शहरातील प्रमुख खासगी शैक्षणिक संस्था, खासगी कोचिंग क्लासेस आहेत. विद्यार्थ्यांच्या गर्दीने कायम गजबजलेला हा परिसर गेल्या काही वर्षांपासून टवाळखोरी वाढल्याने मुलींसाठी असुरक्षित




मानला जात आहे. दुचाकीवरून येणाऱ्या काही टवाळखोरांकडून महाविद्यालयीन, शाळकरी मुलींची छेड काढण्याचे प्रकार वाढले असून, त्यातून तरूणांच्या गटागटांमध्ये हाणामारीच्या घटना घडत आहेत. याच मार्गावर बसस्थानकापर्यंत टवाळखोरी आणि छेडछाड वाढल्याने मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलिसांनी या भागात रोडरोमिओ प्रतिबंधक पथकामार्फत सुरक्षित वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला तरी या भागात कायमस्वरूपी पोलिस बंदोबस्त राहण्यासाठी पोलिस चौकीची गरज व्यक्त केली जात होती. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी या मुद्यावर विधान परिषदेत तारांकित प्रश्न केला होता. तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयाला पत्रव्यवहार करून पोलिस चौकी उभारण्याची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे पोलिस महासंचालकांनी पोलिस दलाकडून अहवाल मागविला होता. त्यानुसार पोलिस चौकीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यात पोलिस विभागाने तीन वर्षातील गुन्ह्यांचा तपशील, वाढती वाहतूक, अन्य पोलिस ठाण्यांवर वाढत असलेला ताण आणि एकूणच पोलिस चौकीची गरज याबाबतची माहिती देण्यात आली होती. त्यानंतर मागील सहा महिन्यांपूर्वी जिजाऊ चौक पोलिस चौकी कार्यान्वित करण्यात आली. या पोलिस चौकीसाठी जवळपास दहा लाख रूपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. मात्र, या ठिकाणी पोलिस चौकी केवळ शोभेची बाहुली म्हणून उभी करण्यात आलेली आहे. या पोलिस चौकीच्या हद्दीत आनंदनगर आणि शहर पोलिस स्टेशनचाही काही भाग येतो. त्यामुळे दोन्ही पोलिस ठाण्याचे दोन दोन कर्मचारी असे एकूण चार कर्मचारी पोलिस चौकीत दररोज नियुक्त करावेत असे आदेश आहेत. परंतु, प्रत्यक्षात मात्र या चौकीत दिवसभर एकही कर्मचारी उपस्थित राहत नाहीत. आनंदनगर आणि शहर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस अधिकारी देखील या पोलिस चौकीकडे फिरकत नाहीत ही गंभीर बाब आहे. सध्या या भागात राज्य मार्गाचे काम सुरू असल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होऊन वादावादीचे प्रसंग उद्भवत आहेत. तसेच महाविद्यालयीन तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर गँगवॉर सुरू आहे. पंधरा दिवसांपूर्वी एक तरुण कोयता घेऊन भर रस्त्यात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. यातून काही अघटीत घटना घडली तर त्याला जबाबदार कोण असेल? ज्यांच्या प्रयत्नामुळे पोलिस चौकी मंजूर झाली ते सुरेश धस भाजपचे आमदार आहेत. सध्या सरकार भाजपचे असून, गृहमंत्रीपद हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असताना पोलिसांकडून पोलिस चौकीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

# घाटंग्रीत महिलेसह कुटुंबीयांना लोखंडी रॉडने मारहाण; धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**आरंभ मराठी। धाराशिव**

घाटंग्री येथे सामाईक क्षेत्रातील नुकसानभरपाईच्या वादातून एका महिलेसह तिच्या सासू-जाऊवर गंभीर मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी विजया गोकुळ राठोड (वय 39, रा. घाटंग्री तांडा) यांनी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि. 02 डिसेंबर रोजी सकाळी अंदाजे आरोपी सुरजितसिंह महादेव राठोड, सागरसिंह महादेव राठोड, सुनिता महादेव राठोड, लता सागर राठोड, सायली सचिन जाधव (सर्व रा. घाटंग्री) यांनी फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांवर सामाईक क्षेत्रातील नुकसानभरपाईची आढवणी का केली याचा राग मनात धरून गैरकायद्याची गर्दी जमवली. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या सासू-जाऊ यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केलीच, शिवाय लोखंडी रॉड व दगडानेही हल्ला करून त्यांना जखमी केले. फिर्यादीच्या पतीलाही मारहाण करत जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादित करण्यात आला आहे. फिर्यादी विजया राठोड यांनी 04 डिसेंबर रोजी तक्रार दाखल केली असून धाराशिव ग्रामीण पोलिसांनी आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम 118(1), 115(2), 352, 351(2)(3), 189(2), 191(2)(3), 190 अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे...

६ डिसेंबर १९५६ या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कोट्यवधी अनुयायांना दुःखसागरात लोटून अनंतात विलीन झाले. त्या काळातील कोट्यावधी अस्पृश्य बांधवांसाठी तो दिवस अत्यंत क्लेशदायक होता. त्या काळातील अस्पृश्य जनतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपला उद्धारकर्ता मानले होते. हा दिवस आता महापरिनिर्वाण दिन म्हणून ओळखला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन लाखो लोक आजही त्यांना आपला 'मसीहा' मानतात व आजच्या दिवशी आदरांजली वाहतात. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी आजही भरलेली नाही. आजच्या सोशल मीडियाच्या काळात अमोल बोरुडे या तरुणाने ६ डिसेंबर १९५६ या दिवसाची जिवंत आठवण करून देणारे क्षण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) साहाय्याने तयार केले आहेत. त्याचा हा व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओत ६ डिसेंबर १९५६ च्या त्या दिवसाची थेट रिपोर्टिंग दाखवण्यात आली आहे. रेडिओवरून बाबासाहेब गेल्याची बातमी येताच लोकांच्या प्रतिक्रिया, चैत्यभूमीवरील प्रचंड गर्दी, रडणारे चेहरे, हात जोडलेले अनुयायी—सगळेच इतके जिवंत वाटते की डोळे पाणावतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य जातीत जन्माला आले. अब्राहम लिंकन आणि स्टॅलिन यांच्याप्रमाणे त्यांनाही सामाजिक वातावरण अनुकूल नव्हते. तरीही त्यांनी देशाच्या जनजीवनात क्रांती घडवून आणली.लिंकनने उत्तर व दक्षिण राज्यांना एकत्र करून अमेरिकेतील काळागोऱ्यांतील भेद नष्ट केला आणि लोकशाही राजवटीचा पाया रचला. याउलट स्टॅलिनने व्यक्तिस्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवून संपूर्ण राज्य समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेच्या चौकटीत आणले.



डॉ. आंबेडकरांनी लोकशाही आणि समाजवाद यांचा समन्वय साधण्याचे स्वप्न पाहिले. अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली. माणसामाणसातील भेद दूर करण्यासाठी देशाला संविधान दिले. केवळ अस्पृश्य समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारतीय समाजाचा उद्धार त्यांनी संविधान लिहून केला.१९१३ ते १९१६ या तीन वर्षांत डॉ. आंबेडकर कोलंबिया विद्यापीठ, न्यूयॉर्क येथे शिक्षण घेत होते. तेथे त्यांनी इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला.अमेरिकेतील 'निग्रो प्रॉब्लेम'शी भारतातील अस्पृश्यतेचा संबंध जोडताना त्यांनी "भारतातील जाती" या निबंधात लिहिले की,"आमचे वंशिक भेद नाहीत; अस्पृश्य समाज हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे." थोडक्यात, डॉ. आंबेडकरांचा लढा हा समतेचा, न्यायाचा आणि मानवतेचा होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!" हा संदेश दिला. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, कारण त्यातूनच त्यांचा उद्धार होईल—हे त्यांनी ओळखले होते. सिडनहॅम कॉलेजमध्ये पॉलिटिकल इकॉनॉमी या विषयाचे प्राध्यापक म्हणून निवड झाल्यानंतरचा एक प्रसंग त्यांच्या तळमळीचे दर्शन घडवतो. एका अस्पृश्य विद्यार्थ्याच्या नातलगास वाटले की डॉ.आंबेडकर परीक्षक म्हणून त्याला पास करतील. म्हणून ते बाबासाहेबांना भेटायला आले व त्या विद्यार्थ्याला पास करण्याची गळ घालू लागले.परंतु बाबासाहेबांनी स्पष्ट नकार दिला, कारण त्यांचे मत असे होते की अस्पृश्य विद्यार्थी हे इतरांपेक्षा बुद्धिमत्तेत कमी नसावेत.

२१ मार्च १९२० रोजी कोल्हापूर राज्यातील माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद झाली. या परिषदेत छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की—"आंबेडकरांमध्ये तुम्हाला तुमचा उद्धारकर्ता लाभला आहे; तो तुमच्या शृंखला तोडल्याशिवाय राहणार नाही. ते भारतातील अग्रगण्य नेत्यांमध्ये सामील होतील."त्यांची ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली. नंतर डॉ. आंबेडकरांनी लंडनमध्ये जाऊन D.Sc. आणि M.Sc. या दोन पदव्या संपादन केल्या. विविध आयोगांपुढे, सभांमध्ये आणि आंदोलनांतून त्यांनी अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या मते "ज्यापर्यंत एवढा मोठा अस्पृश्य समाज हीनदीन अवस्थेत पंगू होऊन आहे, तोपर्यंत हा देशही हीनदीन अवस्थेतच राहील."

ब्राह्मणेतर व अस्पृश्यांच्या प्रगतीबाबत ते म्हणाले "हे दोन्ही समाज एकत्र येऊन आत्मप्रगतीची चळवळ चालवतील, तर पांढरपेशा समाजाच्या गुलामगिरीतून लवकर मुक्त होतील." १९२७ च्या महाड सत्याग्रहापासून त्यांनी सामाजिक, धार्मिक आणि राजकीय लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. त्या वेळी त्यांनी आचार–विचार–उच्चार ही त्रिसूत्री स्वीकारण्याचा उपदेश केला.

त्यांनी सांगितले—मृत पशूंचा मांसाहार त्यागा,उष्टे अन्न खाऊ नका,उच्चनीचत्वाच्या कल्पना सोडा,पांढरपेशा व्यवसाय स्वीकारा,शेती करा,स्वच्छ रहा,मुला–मुलींना शिक्षण द्या.

२ ऑक्टोबर १९३० रोजी परळ येथे गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वीच्या निरोपसमारंभात ते म्हणाले "अस्पृश्यांनाही स्वराज्य हवे आहे. भावी राज्यघटनेत त्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे."गोलमेज परिषद व पुणे करारामधून त्यांनी अस्पृश्यांच्या अधिकारांसाठी तळमळीने लढा दिला.१९ एप्रिल १९४२ रोजी चौपाटीवरील वाढदिवस समारंभात त्यांनी सांगितले—"इतरांच्या मदतीवर जगू नका; स्वावलंबी व्हा."महाभारतातील कचाच्या उदाहरणाने त्यांनी युवकांना आपल्या समाजाला न सोडण्याचा उपदेश केला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. आंबेडकरांनी विशाल जनसमुदायास बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यांनी सांगितले, "जसे शरीर निरोगी असावे, तसे मनही सुसंस्कृत असावे.गरीब माणसाला धर्माची आवश्यकता अधिक असते.' एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक परिवर्तन घडवण्यात यशस्वी झाले. म्हणूनच ते आजही कोट्यवधी जनतेचे "उद्धारकर्ता" म्हणून पूजले जातात. उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे...



- किशोर जाधव,
सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी समितीचे निवेदन


## तत्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा



आरंभ मराठी । धाराशिव

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने शुक्रवारी (दि.५) धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील वाढत्या अतिक्रमण, अस्वच्छता आणि वाहतूक कोंडीबाबत नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले. विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती फळांचे गाडे, खाद्यपदार्थांचे स्टॉल, प्रवासी रिक्षांच्या रांगा व कचरा टाकण्याच्या घटनांमुळे परिसर अत्यंत अस्ताव्यस्त आणि अस्वच्छ झाल्याची तक्रार समितीने केली. या ठिकाणी मद्यप्राशन केलेल्या काही व्यक्ती लघुशंका व घाण करीत असल्यामुळे वातावरण दूषित होत असून, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. तसेच पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात डिजिटल बोर्ड लावल्याने चौकाचे सौंदर्य हरवत चालले आहे. शिवरायांच्या पुतळ्याची नियमित स्वच्छता होत नसल्यामुळे त्याचा बहुतांश भाग दुर्लक्षित अवस्थेत राहतो, याबाबतही समितीने तीव्र आक्षेप नोंदवला. या सर्व गोष्टींमुळे समस्त धाराशिवकर व शिवभक्त यांच्या भावना तीव्र झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. परिसरातील वाढते अतिक्रमण दूर करण्यासाठी, पुतळा परिसराचे रुंदीकरण, डिजिटल बोर्डवरील बंदी, चोवीस तास नगरपरिषदेचे दोन सफाई कर्मचारी नियुक्त करणे तसेच पुतळ्याच्या पावित्र्यासाठी पोलीस विभागास पत्रव्यवहार करून चोवीस तास पोलीस बंदोबस्त ठेवावा, अशी प्रमुख मागणी समितीने केली. पुतळा परिसरात एखादी अघटीत घटना घडल्यास त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला. या मागण्या तत्काळ मान्य न झाल्यास समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला असून प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे उपाध्यक्ष हनुमंत यादव, सचिव आकाश भोसले, शहराध्यक्ष संतोष घोरपडे, हनुमंत तांबे, व्यंकटेश पडिले, अमोल साळुंके, रामानंद माडेकर, विशाल पवार, बालाजी क्षीरसागर, योगेश आतकरे, ॲड. जयप्रकाश साळुंके यांच्यासह समितीचे अनेक आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अचूक निर्णय क्षमता



'माझा हा निर्णय चुकला, त्यामुळे मला त्याचा खूप त्रास झाला.' किंवा ' मी घेतलेला निर्णय अचूक ठरला.त्यातून माझा चांगला फायदा झाला.' आपल्याला असे संवाद ऐकायला मिळतात. आयुष्यात आपण अनेक निर्णय घेत असतो.घरी, कामाच्या ठिकाणी,समाजात वेगवेगळी कामे करताना आपल्याला काही निर्णय घ्यावे लागतात.त्या निर्णयावर आपले यश-अपयश अवलंबून असते.खरंतर अचूक आणि योग्य निर्णय करता येणं हे माणसाचं कौशल्य असते.कुटुंबामध्ये किंवा एखाद्या आस्थापनामध्ये काम करताना माणसाला नियमाला धरुन तर कधी परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतात.त्यामध्ये कधीकधी लवचिकता ठेवावी लागते.ते निर्णय घेत असताना त्याचे चांगले अथवा वाईट परिणाम काय होतील याचाही विचार करावा लागतो. शक्यतो असे निर्णय करताना नुकसान होणार नाही याकडे पाहिले जाते.शिस्त, कर्तव्य, जबाबदारी याबाबत निर्णय घेताना खूपदा सखोल विचार करावा लागतो.अनुभवातून माणसाला योग्य निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त करता येते.एखादे वेळी निर्णय चुकू शकतो.त्याचा जास्त विचार न करता त्याची जबाबदारी स्वीकारावी लागते.पुढच्या वेळी मात्र निर्णय घेताना विचारमंथन करुन,अन्य लोकांशी चर्चा करुन निर्णय घेतला तर तो यशस्वी ठरण्याची शक्यता जास्त असते. काही निर्णय घेताना धाडसीपणा त्याचबरोबर धोका पत्करण्याची तयारी ठेवावी लागते. तरच तुम्ही काही तरी ठोस काम करु शकता. परंतु भीतीपोटी निर्णय घेण्याचे टाळणे म्हणजे तुमच्या कमकुवत पणाचे लक्षण समजले जाते.कधीकधी एखादा निर्णय घेऊन तो यशस्वी करण्याची धमक ज्यांच्यामध्ये असते अशी माणसे यशस्वी होतात.ज्यांचे विचार ठाम न असतात.ज्यांच्यात प्रचंड आत्मविश्वास असतो.स्वत:वर विश्वास असतो.अशी माणसे कणखरपणे निर्णय घेऊन तो अंमलात आणतात. भीतीच्या छायेखाली वावरणारी माणसे योग्य व अचूक निर्णयाअभावी स्वतः बरोबर इतरांचे नुकसान करत असतात.सतत नकारात्मक विचार करणारी माणसं भीतीपोटी योग्य निर्णय घेण्यास अपयशी ठरतात .त्याचे विचार इतके कमजोर बनलेले असतात की त्यांना प्रत्येक निर्णयात संकट किंवा भीती दिसते. मग अशी माणसं निर्णय घेण्याचे टाळतात. वेळ मारुन नेण्याकडे त्यांचे लक्ष असते. चालढकल करण्याचा पर्यायही विचारात घेतात.विचारपूर्वक आणि धाडसीपणे निर्णय घेणारी माणसं यशस्वी झाल्याचे पाहावयास मिळते.याबाबतीत छत्रपती शिवाजी महाराज आदर्शवत आहेत.महाराजांनी आपल्या आयुष्यात अनेक निर्णय असे घेतले की त्यांनी ते यशस्वी करुन दाखवले.अचूकपणे निर्णय घेण्याचे महाराजांचे कौशल्य खरोखर आज सर्वांना मार्गदर्शक ठरते.मुलांना लहानपणापासूनच छोटे छोटे निर्णय घेण्याची संधी दिली पाहिजे.त्यातून त्यांच्या विचारांना दिशा मिळते.योग्य अयोग्य विचार करण्याची मेंदूला सवय लागते.फायद्या तोट्याचा विचार केला जातो.निर्णय चुकला तर होणारे परिणाम अथवा तोटा याचे अनुभव मिळतात. मोठे,किचकट, अवघड किंवा जबाबदारीचे निर्णय घेताना घरातील मोठ्या माणसांचा सल्ला घ्यावा हे अनुभवातून शिकतात. निर्णय घेताना पहिल्यांदा चुका होतील.पण त्या चुकांमधून मुले शिकतील.आलेल्या अनुभवातून ,झालेल्या चुकांमधून बोध घेऊन योग्य व अचूक निर्णय घेण्याचे कौशल्य अवगत होईल.

लक्ष्मण जगताप
बारामती
लेखक शिक्षक आहेत.

# भेसळयुक्त तूप प्रकरण म्हणजे माणसाच्या भावनांशी खेळ







**बेंगळुरू** पोलिसांनी नुकतेच गेल्या महिन्याच्या उत्तरार्धात बनावट नंदिनी तूप बनवून विकणाऱ्या शिवकुमार आणि त्यांची पत्नी रम्या या दाम्पत्याला अटक करून या तूप रॅकेटचा पर्दाफास केला. कर्नाटक मधील लोकप्रिय ब्रँड नंदिनी ब्रँडचा वापर करून बनावट तुपाचा गोरखधंदा चालवत होते. पोलिसांनी त्यांच्या युनिटवर टाकलेल्या धाडीत अद्यावत यंत्रसामुग्री उपकरणे सुद्धा जप्त केली.आज शरीर स्वास्थ्यासाठी तसेच विविध हॉटेल्स, देवस्थानांतील प्रसाद बनविण्यासाठी तुपाची मागणी मोठ्या प्रमाणात केल्या जाते. मात्र, दिवसेंदिवस घटत चाललेले गोधन आणि उरलेल्यांची तस्करी करून करण्यात येणारी कत्तल यामुळे दुग्ध उत्पादनावर आधीच मोठा प्रभाव पडला आहे. दुधाच्या भुकटीपासून बनावट पदार्थ, खोवा, पनीर आदी दुग्धयुक्त पदार्थांत सुद्धा मोठ्या प्रमाणात भेसळ व्हायला लागली आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून तुपातील वाढलेल्या भेसळीचे वृत्त वारंवार कानी पडायला लागणे म्हणजे, एका माणसाच्या स्वास्थाशी दुसऱ्या एखाद्या माणसानेच फक्त पैशाच्या मोहापायी खेळावे, हे मात्र चिंताजनक वाटते.भेसळयुक्त तूप म्हणजे शुद्ध तुपात सोयाबीन, पाम आदींचे वनस्पती तेल किंवा इतर पशूंची चरबी मिसळून तयार केलेले तूप असते, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. अन्न आणि औषध प्रशासन आपल्यापरीने यावर अटकाव आणण्याचा प्रयत्न करीत असेलही, पण कदाचित कमी मनुष्यबळा अभावी हे प्रयत्न तोकडे पडत असल्याने आज बाजारातच नव्हे तर तिरुपती बालाजी सारख्या लोकांच्या आस्थेशी जुळलेल्या धार्मिक ठिकाणी सुद्धा भेसळयुक्त तुपातील लाडवांचे प्रकरण बरेच गाजते म्हणजे या भेसळीचे हात कुठवर लांब असावे याचा अंदाज यायला लागते.दक्षिणेतील तिरुपती बालाजी मंदिरात प्रसाद म्हणून लाडू दिले जातात, त्यांची तिरुपती लाडू किंवा 'श्रीवरी लाडू' म्हणून ओळख आहे. हे लाडू दर्शन घेतलेल्या भाविकांना दिले जातात आणि ते खरेदी करण्यासाठी काही काउंटर सुद्धा आहेत. मात्र २०२४ मध्ये देशातील सर्वाधिक श्रीमंत असलेल्या या देवस्थानातील प्रसादात भेसळयुक्त तूप वापरत असल्याचा मुद्दा देशभर गाजला होता. प्रसादाच्या लाडूंमध्ये तुपाऐवजी प्राण्यांच्या चरबीचा वापर करण्यात आल्याचा आरोप चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. मात्र, वायएसआर पक्षाने हे आरोप फेटाळून लावले होते. पण, तिरुमला तिरुपती देवस्थानचे कार्यकारी अधिकारी श्यामला राव यांनी मात्र प्रसाद तयार करण्यासाठी तुपाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचं सांगितलं होतं. आधी फक्त वनस्पती तुपाच्या भेसळीबाबत सांगणाऱ्या श्यामला राव यांनी या तुपातही प्राण्यांची चरबी असल्याचं एका पत्रकार परिषदेत सांगितलं असल्याचं वृत्त होतं. तिथेच तिरुमला तिरुपती देवस्थानम ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष बी आर नायडू यांनी सुद्धा भेसळयुक्त तूप प्रकरणी दुजोरा दिला होता. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एस आय टी ला असे आढळून आले होते की, सुमारे २५० कोटी रुपयांच्या ६८ लाख किलो तुपामध्ये पाम तेल आणि इतर विषारी घटक मिसळले गेले होते. आणि हा खेळ कित्येक भाविकांच्या भावनांशी, स्वास्थाशी खेळला गेला आहे.प्राण्यांच्या चरबीपासून बनविल्या तुपाचे नाव ऐकताच कित्येकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असतील, हे वेगळे सांगायला नको. बीबीसी तेलुगूच्या माहितीनुसार याप्रकरणी एसआयटीनं उत्तराखंडमधील ररकीच्या भोलेबाबा ऑर्गेनिक डेअरीचे संचालक विपिन जैन आणि पोमिल जैन या दोघांना अटक केली होती. याशिवाय तिरुपती जिल्ह्यातील वैष्णवी डेअरी स्पेशलिटिज लिमिटेडचे सीईओ अपूर्व विनयकांत चावडा आणि तमिळनाडूतील डिंडीगुलमधील एआर डेअरीचे व्यवस्थापकीय संचालक राजू राजशेखरन यांनाही अटक करण्यात आली होती. विशेष म्हणजे तिरुपती बालाजी मंदिरात लाडूच्या प्रसादाची परंपरा गेल्या ३०० वर्षांपासून सुरू असून या प्रसादात जर भेसळयुक्त तूप वापरले गेले असेल तर एकप्रकारे हा भगवान तिरुपतीचा अपमानच ठरतो. आता नुकतेच नोव्हेंबरमध्ये कामठी पोलिसांनी भिलगाव जवळील ताज लॉनच्या मागे असलेल्या एका गोदामावर छापा घालून मोठ्या प्रमाणात गोमांस, सांगाडे, हाडे , कातडे आणि शिंगे जप्त केली होती. यावेळी जमलेल्या संतप्त जमावाने चरबीने भरून ठेवलेले ३० डब्बे आणि शेकडो चामडे नष्ट केले होते. याठिकाणी ३० ते ४० डब्बे चरबीयुक्त तूप साठवून ठेवल्याचे म्हटल्या गेले होते. हे गोदाम अब्दुल हाफिज शेख करीम याच्या मालकीचे असल्याचे समोर आले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात चरबीयुक्त तूप साठवून नंतर ते विक्रीला पाठविणे म्हणजे लोकांच्या धार्मिक भावनांशी खेळणे नव्हे काय? एकतर गोवंश कत्तलीवर बंदी असतांना इतक्या मोठ्या प्रमाणात तिथे सापडलेले मांस हा कत्तलखाना कित्येक वर्षांपासून सुरू असावा, हे सांगून जाते.काही जागरूक नागरिकांच्या सतर्कतेने पाम तेल, चरबीयुक्त तूप भेसळीची प्रकरणे उघडकीस येत असतांना अन्न आणि औषध प्रशासन नेमके काय करते, हे त्यांनाच ठाऊक. मात्र, नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा भेसळखोरांना कायमची अद्दल घडावी आणि त्यांना दिलेला दंड बघून पुन्हा कुणी नव्याने या भेसळीची कल्पनाही करणार नाही, यासाठी शासनाने कठोर पाऊल उचलायला हवे आहे. ज्या तुपाच्या दिव्याने देवादिकांची आरती करावी, त्यातच जनावरांची चरबी असावी, याहून मोठे पातक अजून कुठले असावे?



लीलाधर दवंडे
( गुणवंत कामगार लेखक )
८४१२८७७२२०
कामठी ( नागपूर )

# पोटासाठी धावणारे लोक...

**सध्या** थंडीचा पारा वाढला आहे. अनेक जण मॉर्निंग वॉक किंवा धावण्यास सुरुवात करत आहेत. थंडीत केलेली मेहनत शरीरात उब निर्माण करते. शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी या काळातील व्यायाम खूप फायदेशीर ठरतो. सर्व शहरांतील मैदाने आता धावणारे, चालणारे आणि व्यायाम करणारे तरुण तसेच वृद्ध लोकांनी गजबजलेली दिसतात. यामध्ये पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसोबतच पोट कमी करण्यासाठी धावणाऱ्यांची संख्या देखील लक्षणीय आहे. आजकालच्या बैठे जीवनशैलीमुळे सुटलेले पोट ही समस्या वाढत चालली आहे. शरीराचा सुबक आकार टिकवण्यासाठी अनेकजण जीव तोडून धावताना पाहायला मिळतात. त्याचबरोबर अशा लोकांना मधुमेह, रक्तदाब आणि हृदयरोग यांसारख्या आजारांची भीतीही जाणवत असल्याने ते धावण्यामागे अधिक प्रेरित होतात. थोडक्यात, मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय आणि श्रीमंत लोक कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी धावत आहेत. याउलट रोजंदारीवर काम करणारे कामगार, सफाई कामगार, कचरा वेचक, नळकार, रंगारी, गिग कामगार, शेतकरी, शेतमजूर आणि बांधकामकामगार यांना वेगळा वेळ काढून व्यायाम करण्याची गरज नसते; त्यांची रोजची कष्टाची कामेच त्यांचा व्यायाम असतात. स्वतःच्या कामावर वेळेवर पोहोचण्यासाठी हे लोक थंडीच्या कडाक्यातही धावताना दिसतात. खरंतर हे सारे लोक पोटासाठी धावत आहेत फरक एवढाच की काही लोकांना मैदानावर धावून आपले पोट कमी करायचे आहे,तर अंगमेहनत करणाऱ्या लोकांना मात्र धावा धाव करून आपले पोट भरायचे आहे. म्हणून कमी उत्पन्न गटातील लोक भाकरीसाठी धावतात, तर उच्च उत्पन्न असणारे लोक खाल्लेली भाकरी जिरवण्यासाठी धावतात, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज भारतातच नव्हे तर जगभर आर्थिक विषमता पराकोटीची वाढत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत गरीब लोकांना अधिक कष्ट करावे लागत आहेत. वाढत्या विषमतेमुळे जगातील अनेक ठिकाणी अराजकता निर्माण होत आहे. १९८० च्या दशकापासून नवउदारमतवादी धोरणे राबवण्यात आली. मुक्त अर्थव्यवस्थेची धोरणे स्वीकारायला लावून अनेक देशांतील कल्याणकारी राज्यव्यवस्थांचा ऱ्हास झाला. मानवी गरज–इच्छांचे रूपांतर नफा कमावणाऱ्या उद्योगांत झाले. या धोरणांमुळे विषमतेला खतपाणी मिळाले. यातून विविध सामाजिक आणि राजकीय प्रश्नही वाढू लागले. देशातील संपत्तीचे केंद्रीकरण मूठभरांच्या हाती गेले. आज फक्त एक टक्का सर्वात श्रीमंत व्यक्तीकडे एकूण संपत्तीपैकी जवळपास ४०% संपत्ती जमा आहे. त्यांच्या खालोखाल मध्यम व उच्च मध्यमवर्गाकडे उर्वरित मोठा वाटा आहे. मागच्या आठवड्यात भाकरीसाठी धावणाऱ्या लोकांसाठी एक आशादायी बातमी वाचनात आली. ती अशी—"येत्या काही वर्षांत ना नोकरीची गरज असेल, ना पैशांची; कारण गरिबी संपून जाईल." टेस्लाचे CEO इलॉन मस्क यांच्या मते, पुढील १०–२० वर्षांत AI आणि रोबोटिक्समुळे नोकरी करणे किंवा पैसा कमावणे ही अपरिहार्य गोष्ट राहणार नाही. लोक केवळ आवडीसाठी काही कामे करतील. पैसा दुय्यम होईल; बहुतेक कामे रोबोट करतील आणि गरिबीचा अस्तित्व नाहीसे होईल. असे झाले तर ते मानवाच्या उत्क्रांतीतील एक सुवर्णयुग ठरेल. आज मात्र वास्तव वेगळे आहे. भाकरीसाठी धावणाऱ्या लोकांना थंडीमुळे अधिक हाल होत आहेत. बिगारी काम करणाऱ्या बांधकाममजुरांच्या पायांना भेगा पडल्या आहेत. एटीएमसमोर आणि इतर अन्य ठिकाणी पहारा देणाऱ्या वॉचमनला थंडीमध्ये तासन्तास उभे राहावे लागत आहे. शेतकरी–शेतमजूरांना रक्त गोठवणाऱ्या थंडीतही चिखलात उतरून पिकांना पाणी द्यावे लागत आहे. भाकरीसाठी धावणाऱ्या या लोकांचे जीवन भविष्यातील प्रत्येक ऋतुत आणि नैसर्गिक संकटातही सुखकर होईल, ही आशा बाळगू या.



- किशोर जाधव,
सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# महायुती सरकारने वर्षभरात धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला गती दिली

## भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांची माहिती

आरंभ मराठी । धाराशिव

महायुती सरकारच्या एक वर्षाच्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी भरीव प्रयत्न करण्यात आले असून महायुती सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय दिला. तसेच धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला गती दिली, अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महायुती सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्यासोबतच धाराशिव जिल्ह्यात देखील महायुती सरकारने विकासाची गंगा आणली असून, त्यातून जिल्हा प्रगतीपथावर असल्याचे ते म्हणाले. राज्यात महायुतीच्या माध्यमातून सुशासन सुरू असून विकासाला गती मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. धाराशिव जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी 11,700 कोटींच्या योजनांना वेग देण्यात आला असून, टप्पा क्रमांक सहाच्या कामांना मंजुरी मिळाल्याने उमरगा–लोहार परिसरातील नागरिकांना थेट फायदा होणार असल्याचे ते म्हणाले. निम्न तेरणा प्रकल्पासाठीही निधीची तरतूद करण्यात आली आहे. तर 55 वर्षे जुन्या कुरनूर योजनेलाही महायुती सरकारने गती देऊन 29 कोटी 65 लाखांच्या खर्चातून 3 लाख 65 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली



आणण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याचे म्हणाले. यावेळी कुलकर्णी यांनी तुळजाभवानी देवीला रेल्वे नकाशावर स्थान मिळवून देण्यात आले असल्याचे सांगितले. धाराशिव–तुळजापूर–सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी तब्बल 3295 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून भाविकांसह व्यापारी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. आई तुळजाभवानी मंदिर परिसराचा वारसा वैश्विक दर्जाचा करण्यासाठी 1865 कोटींचा निधी सरकारने उपलब्ध करून दिला आहे. भूसंपादनासाठी 500 कोटींपेक्षा अधिक तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. धाराशिव येथील वैद्यकीय सेवेला बळ देण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी 31 एकर जमीन उपलब्ध करून देत 430 कोटी रुपयांचा निधी सरकारने मंजूर केला आहे. याशिवाय शहरात 230 कोटी रुपये खर्चून 500 बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभे राहत असून शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या शस्त्रक्रिया विभागासाठी 39 कोटी 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वैद्यकीय संकुलामुळे धाराशिव शहराचा विकास नव्या उंचीवर जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तांत्रिक वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी टेक्निकल टेक्सटाइल पार्कसाठी 24 कोटी रुपयांची मंजुरी मिळाली असून, या प्रकल्पात गुंतवणुकीची इच्छा अनेक उद्योगांनी व्यक्त केली आहे. येथून तब्बल आठ हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील 9 लाख 76 हजार शेतकऱ्यांना राज्य सरकारने 1278 कोटींची मदत करून दिलासा दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयासाठी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी पाया रचला आणि आमदार राणा पाटील यांनी कळस रचला असल्यामुळेच आज वैद्यकीय संकुल उभे राहत असल्याचे ते म्हणाले. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महायुती सरकार कटिबद्ध असून विकासाच्या गतीमुळे राज्य पुढे निघाले आहे, असेही जिल्हाध्यक्ष कुलकर्णी यांनी सांगितले. महायुती सरकारमधील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे त्यांनी आभार मानले. या पत्रकार परिषदेला दत्तात्रय देवळकर आणि प्रवक्ते नितीन भोसले उपस्थित होते.

# पदवीधर मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जाहीर ; दावे-हरकती 18 डिसेंबरपर्यंत स्वीकारणार

आरंभ मराठी । धाराशिव

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणी कार्यक्रमाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली प्रारुप मतदार यादी दिनांक ३ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रारुप मतदार यादीबाबत काही आक्षेप किंवा त्रुटी असल्यास,दिनांक ३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. प्रारुप मतदार यादीसंबंधी दावे व हरकती स्वीकारण्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यानुसार काही दावे किंवा हरकती सादर करावयाच्या असल्यास, अर्जाचा विहित नमुना क्रमांक १८,०७ आणि ०८ मध्ये संबंधित मतदान केंद्रावर नियुक्त अधिकाऱ्यांकडे दिनांक १८ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सादर करावयात. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप मतदार यादीचे अवलोकन करून, दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंत दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्षभर स्थगितीच; प्रगतीचा पत्ता नाही

## शिवसेना प्रवक्ते तानाजी जाधवरांचा भाजपवर पलटवार

आरंभ मराठी । धाराशिव

सत्तेवर आलेल्या महायुतीच्या सरकारला वर्ष पूर्ण होत असतानाच, प्रगतीपेक्षा स्थगितीसाठीच भाजपचे नेते शक्ती पणाला लावत आहेत, असा थेट आरोप करीत शिवसेनाचे (ठाकरे गट) जिल्हा प्रवक्ते तानाजी जाधवर यांनी जोरदार पलटवार केला. जाधवर म्हणाले, कृष्णा–मराठवाडा सिंचन प्रकल्प दरवर्षी पूर्ण झाल्याचं जाहीर होतं; पण



प्रत्यक्षात भाजप वस्तुस्थितीपासून पळ काढते आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्रासाठी मंजूर झालेल्या १,८६५ कोटींचा एक रुपयाही प्रत्यक्षात न आल्याचे त्यांनी सांगितले. आज जे काम सुरू आहे ते संस्थानाच्या ठेवी फोडून... हे भाजपने केलेलं अभूतपूर्व पाऊल आहे, असा आरोपही त्यांनी केला.धाराशिव वैद्यकीय महाविद्यालयाबाबतही त्यांनी भाजपला चिमटा काढला. महाविकास आघाडीनं मंजूर केलेल्या या महाविद्यालयाला मागील चार–पाच वर्षांत तुमच्या सरकारला एक वीटही रचता आली नाही,टेक्निकल टेक्सटाईल प्रकल्पाबाबतही त्यांनी ताशेरे ओढले.कागदांवरची यादी हनुमानरायाच्या शेपटासारखी लांबत चालली; पण प्रत्यक्षात शून्य प्रगती,असे ते म्हणाले. जिल्ह्याच्या स्थगितीसाठी इतकी शक्ती घालवणाऱ्यांनी तीच ताकद विकासासाठी वापरली असती, तर जनता आज मागे पडली नसती. महायुतीचे घटक पक्ष परस्परांची जिरवण्यातच धन्यता मानत असतील, तर त्यांच्याकडून विकासाची अपेक्षा तरी कशी करावी, असा सवाल त्यांनी केला.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ.पाटील यांचा जिल्हा दौरा



धाराशिवः – नगर पालिकेच्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हा दौरा आयोजित केला आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका कुठल्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता असल्याने पक्षाने कंबर कसली आहे. जिल्हाध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील हे ७ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात ते जिल्हा परिषद गटनिहाय बैठका तसेच इच्छुक उमेदवारांशी संवाद साधून त्यांची चाचपणी करणार आहेत. नगरपालिकेप्रमाणे जर जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका लढताना महाविकास आघाडीत सन्मानाने स्थान नाही मिळाले तर राष्ट्रवादीची स्वतंत्र तयारी सज्ज असावी, या हेतूने पक्षाच्या आदेशानुसार जिल्हा पातळीवरील संघटनात्मक कामाला गती देण्यात आली आहे. या दौऱ्यात नवीन पदाधिकारी निवड, इच्छुकांची पडताळणी आणि संघटन बळकटीकरण यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामुळे जिल्हाभरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये उमेदवार–कार्यकर्त्यांमध्ये चांगला उत्साह दिसून येत आहे.

# खामसवाडी येथे सिध्दीविनायक सोसायटीकडून माती–पाणी परीक्षण केंद्र

आरंभ मराठी । धाराशिव

जागतिक मृदा दिनानिमित्त श्री सिद्धीविनायक सोसायटीच्या वतीने खामसवाडी येथे माती व पाणी परीक्षण संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य तपासणीसाठी अत्यावश्यक आणि वैज्ञानिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या केंद्रात मातीतील पोषकतत्त्वांचे विश्लेषण, पाण्याची गुणवत्ता तपासणी, संतुलित खत व्यवस्थापन, तसेच पिकउत्पादन वाढीसाठी तज्ज्ञ मार्गदर्शन अशा सेवा अल्प दरात देण्यात येणार आहेत. मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी वैज्ञानिक विश्लेषण गरजेचे असल्याचे आयोजकांनी सांगितले. प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर यांनी माती परीक्षणाचे फायदे स्पष्ट करताना सांगितले की, "मातीचे अचूक परीक्षण केल्याने खतांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करता



येतो. त्यामुळे उत्पादनात १५ ते २५ टक्के वाढ होते. अनावश्यक रासायनिक खतांचा वापर टळून खर्चात बचत होते. मातीतील पीएच, सेंद्रिय कार्बन, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता परीक्षणातून ओळखता येते. त्यामुळे वैज्ञानिक शेती, पिक फेरपालट, आणि टिकाऊ उत्पादन शक्य होते. कार्यक्रमास श्री सिद्धीविनायक परिवारातील गजानन पाटील, प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर, बलराम कुलकर्णी, तसेच गावातील शेतकरी अनिल शेळके, नाना भुतेकर, विश्वास कोकणे, श्रीनिवास झोरी, विजयकुमार झोरी, राजेश गरड, सादिक सय्यद, श्रीमंत शेळके, सतिश वैदय, निशिकांत महाजन, सुशीलकुमार पारील, दत्तात्रय शेळके, महेश शेळके, श्रीमंत पाटील, प्रशांत सुरवसे, सुशिल यादव, कुलदीप सावंत, विकासकुमार झोरी, उध्दव शेळके, दत्ता जोशी यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. जागतिक मृदा दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमामुळे निरोगी मृदा भरघोस उत्पादन हा संदेश बळकट होत असून, शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे. हे केंद्र उत्पादनक्षमता वाढविण्यास आणि खर्चात बचत करण्यास उपयुक्त ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# युवक कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी आश्लेष मोरे कायम

## ते व्हायरल पत्र खोटे व बनावट, चौकशी सुरू केल्याची माहिती

उमरगा :-धाराशिव जिल्हा युवक कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष आश्लेष मोरे यांच्या निलंबनाबाबतचे एक पत्र सध्या विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारित केले जात आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त किंवा कायदेशीर माध्यमाद्वारे कोणतीही मंजुरी, मान्यता किंवा प्रमाणीकरण दिले नसतानाही, प्रश्नातील कागदपत्र अनधिकृत आणि बनावटपणे अधिकृत निर्देश म्हणून सादर केले जात असल्याची मिहती उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे. कमिटीच्या पदाधिका-यांनी सांगितले की, प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्यासाठी, अशी दिशाभूल करणारी सामग्री तयार करण्यासाठी आणि प्रसारित करण्यासाठी जबाबदार असलेल्या



स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन केली जाईल. समितीच्या निष्कर्षांवर आधारित, कठोर शिस्तभंगाची कारवाई सुरू केली जाईल. भविष्यात असे कोणतेही गैरवर्तन झाल्यास अशाच उपाययोजना लागू केल्या जातील. सर्व पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्त्यांनी प्रदेश युवक कॉंग्रेसच्या कायदेशीर माध्यमांद्वारे जारी केलेल्या सत्यापित आणि अधिकृतपणे पत्रव्यवहारांवरच अवलंबून राहावे, असे आवाहन शिवराज मोरे यांनी केले आहे, असे उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने सांगण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अश्लेष मोरे, विजय वाघमारे, एम.ओ. पाटील, दादासाहेब गायकवाड, रेखाताई सूर्यवंशी, तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार, ॲड . पोतदार, ॲड. सगर, मधुकर यादव, विजय दगडे, बाबा मस्के, विशाल काणेकर, सोहेल इनामदार यांची प्रमुख पदाधिकारी उपस्थिती होती.

आरंभ मराठी

## धाराशिवमध्ये रस्ते अपघाताचा घेतला आढावा

# जिल्ह्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांचे निर्देश

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात रस्ते अपघाताचे प्रमाण इतर जिल्ह्याच्या तुलनेत जास्त आहे. जिल्ह्यातील रस्ता अपघाताची सखोल कारणे शोधली पाहिजे. वाहन चालकांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती करणे गरजेचे असून जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात असे निर्देश राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी दिले. गुरुवारी (दि.४) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील रस्ते अपघाताचा आढावा घेताना आयोजित सभेत भिमनवर बोलत होते. जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक श्रीमती. रितू खोखर,प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिवराम केत व एस.एस. मस्के, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक




स्वप्निल कासार व महेश पाटील,राष्ट्रीय महामार्ग उपप्रबंधक अमित पांडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. भिमनवार म्हणाले की, सन २०२४ आणि सन २०२५ मध्ये जिल्ह्यात घडलेल्या रस्ते अपघाताचे विश्लेषण करावे. गोल्डन अवरमध्ये अपघातग्रस्तांना तातडीने सेवा उपलब्ध झाली पाहिजे.रुग्णवाहिका ही कमीत कमी वेळेत अपघातग्रस्त ठिकाणी पोहोचून तातडीने अपघातग्रस्तांना दवाखान्यात घेऊन जाताच तातडीने उपचार मिळाले पाहिजे. जिल्ह्यातील अपघात प्रवण ठिकाणे कोणती आहेत हे निश्चित करून त्या ठिकाणी भविष्यात अपघात होणार नाही,यादृष्टीने उपाययोजना कराव्यात. मद्यप्राशन करून वाहन चालवून अपघात होण्याचे प्रमाण हे जास्त आहे. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभाग व पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे सलग सहा महिने यावर फोकस करून काम करावे.असे भिमनवार यांनी सांगितले. जिल्ह्यात ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक करावे तसेच दुचाकी वाहनांना देखील रिफ्लेक्टर लावावे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होईल.रस्त्याचे व पुलाचे जिथे काम सुरू आहे,त्या ठिकाणी रिफ्लेक्टर व बॅरिकेट्स लावण्यात यावे तसेच काम सुरू असलेल्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात यावे.त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणारे अपघात टाळता येतील. रस्ता सुरक्षेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून घ्यावा. निधीची आणखी आवश्यकता पडल्यास परिवहन विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल.रस्ते अपघात होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणे हे आहे.पुढील दोन तीन महिन्यात मॉनिटरिंग करून रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करावे असे ते म्हणाले. रस्ता सुरक्षेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे जिल्हाधिकारी पूजार यांनी यावेळी सांगितले.

### ३२८ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू

जिल्ह्यात रस्ता अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यामध्ये दुचाकी स्वाराचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी वाहन चालकांचे प्रबोधन व त्याची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत असल्याचे डाके यांनी सांगितले. जिल्ह्यात ऑक्टोबर २०२४ मध्ये २७ अपघातात २९ जणांचा मृत्यू झाला तर ऑक्टोबर २०२५ मध्ये ४० अपघातात ४८ जणांच्या मृत्यू झाला. सन २०२४ मध्ये ऑक्टोबर २०२४ पर्यंत २२७ रस्ते अपघातात २५० व्यक्तींचा आणि सन २०२४ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत ३०२ रस्ते अपघातात ३२८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डाके यांनी यावेळी दिली.

# नांदेडच्या सक्षम ताटे हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देऊन फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवण्याची रिपाइंची मागणी



आरंभ मराठी । धाराशिव

नांदेड येथील मिलिंद नगर परिसरातील बौद्ध तरुण सक्षम ताटे यांच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशा स्वरूपाची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाने शुक्रवारी (दि.4) जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. नांदेडच्या मिलिंद नगर परिसरात राहणाऱ्या सक्षम ताटे यांचे मागील तीन वर्षांपासून आंचल मामीडवार या हिंदू (सवर्ण) समाजातील मुलीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र आंचल मामीडवार यांचे वडील गजानन मामीडवार आणि भाऊ या नातेसंबंधांना ठामपणे विरोध करत होते. या द्वेषातूनच दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी गजानन मामीडवार, त्यांची दोन मुले आणि इतर काही सहकाऱ्यांनी सक्षम ताटे यांना चहासाठी घराबाहेर बोलावून नेले. त्यानंतर गोळ्या झाडून आणि दगडाने ठेचून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींवर फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून फाशीची शिक्षा द्यावी. खून करण्याचा सल्ला दिल्याचा आरोप असणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून सह आरोपी करण्यात यावे, पीडित कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी आणि कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी 50 लाख रुपये शासकीय अनुदान द्यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# परंडा पालिकेतील निकालावरून कार्यकर्त्यांच्या पैजा, लक्ष्मी दर्शनाच्या चर्चांना चढतोय नवा रंग

## दोन्ही गटाकडून विजयाचा दावा, सायलेंट वोटर कुणाच्या पाठीशी राहणार ? यावर निकाल ठरणार




अर्जुन गोडगे । आरंभ मराठी

परंडा -परंडा नगरपरिषदेचे मतदान पार पडले असले तरी शहरातील राजकीय तापमान अजूनही उच्चांकावर आहे. मतदान संपताच मताची आकडेमोड करण्यासाठी झालेल्या गुप्त बैठका आणि प्रभागनिहाय आकडेमोड करण्यातच मागील चार दिवस गेले आहेत. तसेच निवडणुकीत आखलेली रणनीती आणि अनौपचारिक लक्ष्मीदर्शनाच्या चर्चांना शहरात नवा राजकीय रंग चढला आहे. हॉटेल, दुकाने चौका-चौकामध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. नेतेमंडळी विजयाचे दावे करीत असले तरी जय पराजयाच्या नागरिकांमध्ये पैजाही लावल्या जात आहेत. पुढील पंधरा दिवस या चर्चांना आणखी उधाण येणार आहे.

परंड्यात शिवसेनेकडून जाकीर सौदागर व जनशक्ती विकास आघाडीकडून विश्वजीत पाटील मैदानात आहेत. जाकीर सौदागर हे शिवसेनेचे माजी मंत्री तथा आमदार डॉ तानाजीराव सावंत यांचे शिलेदार समजले जातात. सौदागर यांचा परंडा शहराशी असणारा कनेक्ट व सावंत यांनी दिलेली शक्ती जोरदार चर्चांना वेग आला आहे. त्यांच्या विरोधात परंडा विधानसभा मतदारसंघातील सर्वपक्षीय नेत्यांनी जनशक्ती विकास आघाडी स्थापन केली. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, राहुल मोटे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष रणजीत पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाष सिद्दीवाल, कॉंग्रेसचे उपाध्यक्ष नरुद्दीन चौधरी यांची सर्व पक्षीय ताकद पणाला लागली आहे. परंड्यात शिवसेना व जनविकास आघाडी यामध्ये दुरंगी लढत होत असल्याने मतदानाचा दिवस म्हणजे निवडणुकीचा थरार ठरला होता. शहराने मोठ्या उत्साहात प्रतिसाद देत ७८.१३ टक्के मतदान नोंदवले. मतदानानंतर लगेच जिंकणार कोण? या एकाच प्रश्नावर शहरातील प्रत्येक चौक, हॉटेल व गटागटामध्ये जोरदार चर्चा सुरू आहेत.कोणत्या प्रभागात कोणाची गाठ बसली? कोण कोणाला आतून पाठिंबा देत राहिलं? कोणत्या गटाने किती मते घेतली? कोणत्या उमेदवाराला फटका बसणार? कुठे रुसवे फुगवे शांत झाले तर त्याचा थेट कुठे परिणाम झाला? सर्व समीकरणांची चर्चा सध्या रंगताना पहावयास मिळत आहे. मतांची जातनिहाय, गटांनुसार फोडणी देत अंदाज मांडले जात आहेत. मतांचे कोडे सोडवण्यासाठी दोन्ही बाजूंनी धडपड सुरू असली तरी अंतिम निर्णय २१ डिसेंबर रोजी मतपेटी उघडल्यानंतरच समजणार आहे. पुढील काही दिवस शहरातील प्रत्येक पाऊलवाट, प्रत्येक गल्लीतल्या संभाषणाचा सूर आणि प्रत्येक राजकीय हालचाल फक्त एकाच दिशेने फिरताना दिसत आहे ती म्हणजे परंडा शहराचा नगराध्यक्ष असणार कोण?

### नगरपालिकेत प्रमुख नेत्याची प्रतिष्ठा पणाला

नगरपरिषदेची निवडणूक असली तरी तालुक्यातील मोठ्या नेत्याची प्रतिष्ठा या निकालावर थेट अवलंबून असणार आहे. आमदार डॉ सावंतराव यांचे शिलेदार जाकीर सौदागर यांना घेण्यासाठी सर्वपक्षीय नेते मंडळींनी ताकत पणाला लावली आहे. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, राहुल मोटे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष रणजीत पाटील, कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नरुद्दीन चौधरी, माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सिद्धिवाल यांच्यासह सर्व नेतेमंडळीच्या अस्तित्वाचा सामना आहे. तर तानाजी सावंत यांनी ही लढाई प्रतिष्ठेची केली आहे.

### विजय आमचाच होणार आहे

निकाल कधीही लागू द्या, नगराध्यक्ष पदासह नगरसेवकाच्या सर्वच जागा जनशक्ती नगर विकास आघाडी जिंकणार आहे. आम्ही सर्वांनी केलेले एकत्रित काम मतदारांनी दिलेला प्रतिसाद यामुळे विजय आमचाच आहे. सुज्ञ मतदार विरोधकांना निवडणुकीत त्यांची निश्चितच जागा दाखवतील.



**रणजीत पाटील**
जिल्हाध्यक्ष
( शिवसेना, उद्धव ठाकरे गट )

### विजयी उमेदवाराला फारसे मताधिक्य मिळणार नाही

परंडा नगर परिषदेसाठी अत्यंत अटीतटीची निवडणूक झाली असून ९ वर्षांनी निवडणूक झाल्यामुळे मतदाराने मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. त्यामुळे निवडणुकीत विजय कोणाचा होईल हे सांगता येत नसले तरी विजयी उमेदवारांना मताधिक्य मोठे नसणार हे नक्की. वाढलेला मताचा टक्का कोणालाच कल देतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**मधुकर लोखंडे,**
ज्येष्ठ नागरिक.

### गुलाल आम्हीच उधळणार

नगराध्यक्ष पदासाठी तीन ते चार हजार मतांनी माझा विजय फिक्स असून २० नगरसेवक निवडून येणार आहेत. कुणी कितीही दावे केले तरी मतमोजणीच्या दिवशी आमचे सर्व उमेदवार निवडून आलेले दिसतील. या निवडणुकीमध्ये डॉ तानाजीराव सावंत यांची शक्ती व जनसंपर्क यामुळे विजय नक्कीच आमचा आहे व गुलाल ही आम्हीच गुलालही उधळणार.



**- जाकीर सौदागर**
नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

### नेमकं काय होईल सांगता येत नाही

नगरपरिषद निवडणुकीमध्ये क्रॉस वोटिंग मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे नेमकं काय होईल हे सांगता येत नसलं तरी निवडणूक अटीतटीची झाली आहे. जनशक्ती विकास आघाडीने जाकीर सौदागर यांना घेण्यासाठी सर्वपक्षीय नेते एकत्र आले असले तरी थेट एकाही मोठ्या नेत्याची सभा न झाल्यामुळे सर्वपक्षीय नेत्याने एक दिलाने काम केले असे म्हणता येणार नाही. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचा सर्वात मोठा तोटा झाला आहे.



**सुशील शुक्ला,**
ज्येष्ठ पत्रकार

# महाराष्ट्र लोकविकास मंचतर्फे विदर्भीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात



आरंभ मराठी । उमरगा

जलनायक कै. मधुकर धस यांनी आयुष्यभर राबवलेल्या सामाजिक कार्याचा वसा निरंतर चालू राहील, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकविकास मंचचे ज्येष्ठ कार्यकर्ते विश्वनाथ ( अण्णा ) तोडकर यांनी केले. महाराष्ट्र लोकविकास मंचच्या विदर्भीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना गौरविण्यासाठी महाराष्ट्र लोकविकास मंचतर्फे भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. यावर्षीचा कार्यक्रम जलनायक मधुकर धस यांच्या स्मृतीदिनानिमित्त 3 डिसेंबर 2025 रोजी दिलासा संस्था, घाटंजी, जिल्हा यवतमाळ येथे दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया धस उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून रमाकांत बापू, भूमिपुत्र वाघ, दत्ता पाटील व कोंढाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. विजया धस यांनी पुरस्कार सोहळ्याचा हेतू, रूपरेषा आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा यावर प्रकाश टाकला. या भव्य सोहळ्यात जीवन गौरव पुरस्कार:डॉ. मधुकर गुमळे, गुरुकुंज मोझरी, विदर्भ रत्न पुरस्कार:विजय बाबाराव कडू, चांदूर बाजार, मरनोत्तर सामाजिक कार्य गौरव पुरस्कार: कै. प्रा. अविनाश शिर्के, यवतमाळ, सामाजिक कार्य गौरव पुरस्कार: पवनकुमार मिश्रा – लाडेगाव, माधुरी खडसे डाखोरे – राळेगाव, निरुपमा देशपांडे – मेळघाट, शीतल ठाकरे – येरंडगाव, केशव गुरणुळे – गडचिरोली, डॉ. कविता बोरकर – यवतमाळ, दुधराम उर्फ दिलीप बिसेन – भंडारा, जिजा चांदेकर राठोड – बुलढाणा, पाणीदार संस्था सन्मान: जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट, वर्धा यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन रंजीत बोबडे, विजया धस, कोमल धस, बंडू आंबेडकर आणि संगीता गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला राज्यभरातील स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मधुकर धस आणि विजया धस यांनी दत्तक घेतलेल्या मुलांचा आणि कुटुंबीयांचाही मोठा सहभाग होता. प्रास्ताविक विजया धस आणि भूमिपुत्र वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन बंडू आंबटकर यांनी मानले.

## माळुंब्रा ग्रामपंचायतीच्या बंदिस्त गटारीमुळे रस्ता बंद; शेतकऱ्यांची गैरसोय

आरंभ मराठी । तुळजापूर

तालुक्यातील माळुंब्रा येथील ग्रामपंचायतीने शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर बंदिस्त गटारीचे काम केल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. यामुळे वाहतुकीचा मार्ग पूर्णपणे अडथळ्यात आला असून, शेतात ट्रॅक्टर, उसाची वाहने व इतर यंत्रसामग्री नेणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देत रस्ता तातडीने खुला करण्याची मागणी केली आहे. माळुंब्रा परिसरात सुमारे 100 एकरांवरील ऊस याच रस्त्याने कारखान्याकडे वाहतूक होत असतो. मात्र ग्रामपंचायतीने बंदिस्त गटारीचे काम करताना कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता सिमेंट पाईप वर दोन फूट उंच बांधकाम केले आहे. यामुळे रस्ता पूर्णपणे बंद होत असल्याने उसाचे ट्रक, ट्रॅक्टर वाहने किंवा शेतातील इतर यंत्रे आत-बाहेर नेता येत नाहीत. गेल्या सहा महिन्यांपासून गट विकास अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून याची तात्काळ दखल घेऊन योग्य ती चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, रस्ता तातडीने खुला न झाल्यास 11 डिसेंबर रोजी राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे वाहतूक खोळंबण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## नळदुर्ग (आलियाबाद) येथील पुरातन दक्षिणमुखी हनुमान मंदिरात प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा उत्साहात

आरंभ मराठी । नळदुर्ग



नळदुर्ग (आलियाबाद) येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात 5 डिसेंबर रोजी श्री राजगुरू शिवलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधीपती राजगुरू श्री ष. ब्र. बसवराज शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सोलापूर–हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गालगत असलेले हे ऐतिहासिक दक्षिण मुखी हनुमान मंदिर शेकडो वर्षांपासून अस्तित्वात आहे. या मंदिराची देखभाल आणि पूजा-अर्चा आलियाबाद गावचे पोलिस पाटील कै. बाबुराव भिमराव पाटील यांच्या घराण्याकडे शेकडो वर्षांपासून पारंपरिकपणे चालत आली आहे. सध्या मंदिराची देखभाल व दैनंदिन पूजा-अर्चा महेश कोप्पा पाटील हे करीत असून पाटील घराण्याची ही पाचवी पिढी मंदिरसेवेत कार्यरत आहे. महामार्गालगत असल्याने येथे दररोज मोठ्या संख्येने हनुमान भक्त दर्शनासाठी भेट देतात. तथापि, शतकांपासून उभ्या असलेल्या या मंदिराची मोठी पडझड झाल्याने मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय महेश कोप्पा पाटील यांनी घेतला. त्यांच्या पुढाकारातून आणि विविध दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने मंदिराचा भव्य व सुंदर स्वरूपात पुनर्जिर्णोद्धार करण्यात आला. दोन दिवसीय प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळ्याच्या कार्यक्रमाला भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. 4 डिसेंबर रोजी नळदुर्ग शहरातून भव्य कळस मिरवणूक काढण्यात आली. पुढे 5 डिसेंबर रोजी पहाटे 4 वाजता होमहवन विधी पार पडला. सकाळी 11 वाजता श्री बसवराज शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहणाचा मुख्य सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाला भाजप शहराध्यक्ष बसवराज धरणे, सेवानिवृत्त शिक्षक बलभिमराव मुळे, नेताजी महाबोले, माजी नगरसेवक सुधीर हजारे, लोकमान्य गणेश मंडळाचे अध्यक्ष मल्लिनाथ माळगे, पप्पु पाटील, बंडप्पा कसेकर, सोसायटी संचालक रघुनाथ नागणे, जमन ठाकुर, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर दुपारी महाराजांच्या हस्ते महाआरती पार पडली आणि उपस्थित शेकडो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंदिराचे प्रमुख महेश कोप्पा पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी घेतली लेखक प्रा. सुरेंद्र पाटील यांची प्रकट मुलाखत; ग्रामीण प्रशालेचा स्तुत्य उपक्रम

आरंभ मराठी । माडज

ग्रामीण भागात मराठी वाचन–लेखन संस्कृती जपण्यासाठी माडज येथील ग्रामीण प्रशालेत मराठी भाषा समृद्धी उपक्रमांतर्गत एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. मराठीतील प्रसिद्ध लेखक व कादंबरीकार प्रा. सुरेंद्र पाटील यांची प्रकट मुलाखत दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांनी थेट घेतली. सोशल मीडियाच्या विळख्यातून बाहेर पडायचे असेल तर वाचनाशी नाळ जुळली पाहिजे. पुस्तकांच्या सहवासातच जीवन समृद्ध होते. शालेय जीवनापासून लेखनाची सवय लावली तर प्रत्येक विद्यार्थी उत्तम लेखक-कवी होऊ शकतो, असा थेट संदेश प्रा. पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. मुलाखतीदरम्यान विद्यार्थ्यांनी लेखकांना आपले आवडते पुस्तक कोणते? लेखनाची प्रेरणा काय? लेखक व्हायचे असल्यास काय करावे ?कादंबरी कशी तयार करता? शालेय जीवनात लेखन करत होता का? व्यक्तिचित्र आणि कविता समजून




घेण्याची पद्धत काय? असे रोचक प्रश्न विचारले आणि लेखकांकडून मार्गदर्शन घेतले. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन, प्रश्नांची आखणी, मुलाखत, सूत्रसंचालन, व्यासपीठ सजावट ते आभार प्रदर्शन सर्व विद्यार्थ्यांनीच स्वयंस्फूर्तीने पार पाडले. उपक्रमासाठी शिक्षक डॉ. बालाजी मदन इंगळे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. श्वेता रमेश गायकवाड व गायत्री चंद्रकांत माने यांनी मुलाखत घेतली. प्रतिक विठ्ठल भोसले याने सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शन देवयानी गुणवंत गायकवाड हिने केले. या कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक रामजी सोळुंके, शिक्षकवृंद तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरंभ मराठी

## नगर पालिकेने तत्काळ प्रकाशव्यवस्था करण्याची मागणी

# नळदुर्गच्या आलियाबाद स्मशानभूमीत अंधाराचे साम्राज्य

आरंभ मराठी । नळदुर्ग

नळदुर्ग शहरातील एकमेव आलियाबाद हिंदू स्मशानभूमी गेल्या अनेक वर्षांपासून अंधारातच आहे. स्मशानभूमीत कुठलाही दिवा, विजेचा खांब किंवा प्रकाशाची सोय नसल्याने रात्रीच्या वेळी अंत्यविधी नाईलाजाने अंधारातच करावे लागत आहे. यामुळे मयताच्या कुटुंबीयांना तर मानसिक त्रास होतोच, पण सोबत आलेल्या नागरीकांना देखील विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संतप्त नागरीकांनी नगरपालिका प्रशासनाकडे तात्काळ प्रकाशव्यवस्था करण्याची जोरदार मागणी केली आहे. नळदुर्ग शहरातील हिंदू बांधवांसाठी एकच स्मशानभूमी असल्याने येथे गर्दी असते.



परंतु ही स्मशानभूमी शहराच्या मध्यवर्ती भागापासून तब्बल २ किलोमीटर अंतरावर आहे. व्यासनगर, व्यंकटेशनगर, रामलीलानगर, भवानीनगर, इंदिरानगर या वरील भागातील रहिवाशांसाठी तर हे अंतर अधिकच वाढते. असा लांबचा प्रवास करुन स्मशानभूमीत पोहोचल्यावर तेथे प्रकाशाची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना अक्षरशः अंधारात मार्ग शोधावा लागतो. सगळ्यात चिंताजनक बाब म्हणजे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावरही लाईट नाही. त्याचबरोबर स्मशानभूमीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे, गवत, घाण साठलेली आहे. अंधार आणि अस्वच्छता यामुळे अंत्यविधी करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, नगरपालिकेच्या अनास्थेविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शहरातील चौकांत चार–चार बल्ब बसवल्याचा दावा केला जात असताना, हिंदू धर्मीयांचे अंतीम स्थळ असलेल्या स्मशानभूमीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

### नागरिकांची प्रशासनाकडे मागणी

आलियाबाद स्मशानभूमीत तात्काळ विजेची सोय करावी, परिसरातील काटेरी झुडपे, गवत, घाण पूर्णपणे काढून स्वच्छता करावी, स्मशानभूमीच्या प्रवेशमार्गावर व परिसरात पुरेशा प्रकाशयोजनेची व्यवस्था करावी आणि स्मशानभूमीत फुलझाडे, हिरवळ आणि आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे. 21 डिसेंबरनंतर नगरपालिकेचे नवे कारभारी जबाबदारी स्वीकारणार आहेत. त्यांनीही स्मशानभूमीच्या दुरावस्थेकडे लक्ष देऊन येथे कायमस्वरूपी प्रकाशयोजना आणि स्वच्छता राखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. नळदुर्गच्या आलियाबाद स्मशानभूमीतील अंधार आणि अस्वच्छता दूर करण्यासाठी नगरपालिका नेमकी कधी कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परंडा येथे दिव्यांग तपासणी शिबिरात ६२ लाभार्थ्यांची तपासणी



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुका व शहरातील दिव्यांग बांधवांसाठी आयोजित दिव्यांग कार्ड व प्रमाणपत्र तपासणी शिबिर ५ डिसेंबर रोजी तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात एकूण ६२ दिव्यांग बांधवांची तपासणी करण्यात आली. अस्थिभंग दिव्यांगांच्या ३५ रुग्णांची तपासणी डॉ. स्वामी कृष्णा यांनी केली. तसेच मतिमंद दिव्यांग १७ जणांची तपासणी डॉ. सुहास शिंदे, तर अंध दिव्यांग ९ जणांची तपासणी पवन महाजन यांनी केली. दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी दिव्यांग उद्योग समूह महाराष्ट्र राज्य ही सामाजिक संस्था सातत्याने पाठपुरावा करत असून, संस्थेचे राज्याध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. शिबिर यशस्वी करण्यासाठी सरकारी दवाखाना परंडा येथील कर्मचारी, एक्स-रे विभाग तसेच दिव्यांग उद्योग समूहाचे पदाधिकारी तानाजी सांगडे, उत्तम शिंदे, रणजित परदेशी, दिव्यांग विशेष शिक्षक हजगुडे व बेडके यांनी विशेष परिश्रम घेतले. लहान मुलांच्या तपासणीसाठीही या स्वयंसेवकांचे योगदान महत्त्वाचे ठरले. परंडा शहरात दिव्यांग बांधवांच्या सोयीसाठी असा उपक्रम राबवण्यात आल्यानं समाधान व्यक्त केले जात आहे.

''दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा धर्मादाय परवाना रद्द करून सरकारने जमीन ताब्यात घ्यावी,'' अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीनं करण्यात आली आहे.

नेमकं काय म्हणाले संतोष शिंदे? : यासंदर्भात बोलताना संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते संतोष शिंदे म्हणाले, ''दीनानाथ मंगेशकर रुग्णालय धन दांडग्यांचे रुग्णालय आहे. श्रीमंतांशिवाय सामान्य माणसाला तिथं उपचार मिळत नाहीत. काल तनिषा भिसे नावाच्या गरोदर महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाला. त्यांची लेकरं पोरकी झाली. याला दीनानाथ मंगेशकर रुग्णालय जबाबदार आहे. महाराष्ट्र सरकारनं रुग्णालय प्रमुख, डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करावी. तसंच पुणे जिल्हाधिकारी आणि राज्य सरकारनं दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा धर्मादाय परवाना रद्द करून सर्व जमीन सरकारच्या ताब्यात घ्यावी आणि रुग्णालय बंद करावं, अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे. रुग्णालयाच्या प्रशासनाला माणसाचा जीव नाही तर पैसा जवळचा वाटत असेल तर अशांची तिथून हकालपट्टी करावी. अन्यथा संभाजी ब्रिगेड स्टाईलनं उत्तर दिलं जाईल,'' असा इशारा देखील यावेळी शिंदे यांनी दिला.

रुग्णालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त : दीनानाथ रुग्णालयाच्या बाहेर आज विविध संघटनांच्या आणि पक्षांच्या वतीनं प्रशासनाच्या विरोधात आंदोलन केलं जातय. या पार्श्वभूमीवर रुग्णालयाच्या बाहेर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलाय. दरम्यान, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेल्या प्रकारासंदर्भात चौकशी समिती नेमण्यात आली असून त्या समितीच्या माध्यमातून चौकशी करुन अहवाल सादर केला जाणार आहे. तसंच राज्य महिला आयोगानं देखील या प्रकरणाची दखल घेत पुणे महापालिकेच्या आयुक्तांना तथ्य तपासत चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

विविध संघटना आणि पक्ष आक्रमक : दीनानाथ रुग्णालयाबाहेर दोन्ही शिवसेनेसह काँग्रेस आणि पतीत पावन संघटनेच्या वतीनं आक्रमक आंदोलन करण्यात आलं. यावेळी रुग्णालयावर चिल्लर फेकण्यात आली. तसंच पतित पावन संघटनेकडून रुग्णालयाच्या बोर्डाला काळं फासण्यात आलं.

### सुप्रसिद्ध अभिनेते पद्मश्री मनोज कुमार यांचं निधन : वयाच्या ८७ व्या वर्षी घेतला अखेरचा निरोप

मुंबई ४ एप्रिल (पीएसआय)

सुप्रसिद्ध अभिनेते मनोज कुमार यांचं मुंबईतील कोकीळाबेन रुग्णालयात निधन झालं. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मनोज कुमार हे आपल्या प्रखर देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जात होते. त्यामुळेच त्यांना भारत कुमार असं म्हटलं जात होतं.

कोण होते मनोज कुमार : चित्रपट अभिनेते दिग्दर्शक मनोज कुमार यांनी प्रखर देशभक्तीपर चित्रपटांमध्ये अभिनय आणि निर्मिती केली. त्यामुळे त्यांना भारतकुमार अशी ओळख मिळाली. मात्र मनोज कुमार यांचं खरं नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म पाकिस्तानातील अबोटाबाद इथं २४ जुलै १९३७ रोजी झाला. अभिनेते मनोज यांनी सामाजिक आणि देशप्रेमावर आधारित असंख्य चित्रपटांची निर्मिती केली. सिनेविश्वात एक नवी वाट चोखाळली. प्रखर देशभक्तीपर चित्रपट केल्यामुळे त्यांची भारत कुमार, भारताचा सुपुत्र अशी ओळख निर्माण झाली.

हरिकृष्ण गिरी गोस्वामींनी का ठेवलं मनोज कुमार नाव : भारत आणि पाकिस्तान यांच्यात फाळणी झाल्यानंतर मनोज कुमार यांचं कुटुंबीय भारतात आलं. विद्यार्थी दशेत असताना त्यांना लोकप्रिय अभिनेता दिलीप कुमार आणि अशोक कुमार हे प्रचंड आवडायचे. महाविद्यालयात शिकताना त्यांनी दिलीप कुमार यांचा 'शबनम' चित्रपट पाहिला. या चित्रपटातील व्यक्तिरेखेमुळे ते प्रभावित झाले. त्यामुळे त्यांनी आपलं नाव मनोज कुमार असं ठेवलं. याच नावानं त्यांनी पुढच्या काळात अनेक चित्रपटात अभिनय करुन अनेक चित्रपटांची निर्मितीही केली. देशप्रेमानं भारवलेल्या तरुणाची भूमिका त्यांनी आपल्या चित्रपटातून साकारल्या. त्यामुळे त्यांना भारत कुमार अशी नवी ओळख मिळाली.

पंतप्रधान लाल बहादुर शास्त्रींपासून घेतली 'ही' प्रेरणा : पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी देशाला १९६५ मध्ये भारत–पाकिस्तान युद्धादरम्यान 'जय जवान, जय किसान'चा नारा दिला. १९६५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'शहीद' चित्रपटाच्या स्क्रिनिंगसाठी मनोज कुमार दिल्लीत गेले. या काळात अभिनेते मनोज कुमार यांनी लाल बहादूर शास्त्री यांची भेट घेतली. या भेटीत लाल बहादूर शास्त्री यांनी मनोज कुमार यांना ''तुम्ही सैन्य आणि सुरक्षेवर चित्रपट बनवता. मात्र देशाला पाठिंबा देणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणताही चित्रपट बनत नाही, असं सांगितलं. त्यानंतर मनोज कुमार यांनी अवघ्या काही तासात 'उपकार' चित्रपटाची कथा तयार केली. या चित्रपटात मनोज कुमार, आशा पारेख, प्राण आणि प्रेम चोप्रा यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. विशेष म्हणजे या चित्रपटातून त्यांनी दिग्दर्शनातही पदार्पण केलं. या चित्रपटाला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. या चित्रपटातील ''मेरे देश की धरती'' हे गाणं गेल्या सहा दशकापासून भारताच्या सर्व पिढ्या अभिमानानं ऐकत आल्या. या चित्रपटात मनोज कुमार यांनी भारत ही व्यक्तिरेखा साकारली. नंतरच्या असंख्य चित्रपटातून हाच भारत देशसेवा करत राहिला. आजही भारताचा स्वातंर्त्य दिन असो की प्रजासत्ताक दिन हे गाणं वाजत असते. 'उपकार' चित्रपटासाठी मनोज कुमार यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच त्यांचा पहिला फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कारही जिंकला.

### 'लिव्ह इन रिलेशनशीप'मध्ये राहणाऱ्या पीडितेवर प्रियकराच्या भावांचा बलात्कार: वाळूज पोलिसात गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर ४ एप्रिल (पीएसआय)

लिव्ह इन रिलेशनमध्ये असणाऱ्या प्रेयसीवर प्रियकराच्या भावांनीच चार वर्ष अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार वाळूज परिसरात उघड झाला आहे. विशेष म्हणजे लग्न न करता सोबत राहणाऱ्या या दाम्पत्याला दोन मुलं देखील आहेत. मात्र लहान मुलीवर वाईट नजर टाकण्याचा प्रयत्न केल्यानं पीडितीनं पोलिसात तक्रार देत प्रकरण उघडकीस आणलं. ''या प्रकरणी वाळूज पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे,'' अशी माहिती पोलीस निरीक्षक रामेश्वर गाढे यांनी दिली.

प्रियकरासोबत राहत होती 'लिव्ह इन रिलेशन'मध्ये : पीडित महिलेनं दिलेल्या तक्रारीनुसार, ती आठवीत शिकत असताना एका मुलासोबत तिचं सूत जुळलं. काही दिवसांनी कुटुंबीयांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी २०१० मध्ये एका युवकासोबत पीडितेचा विवाह लाऊन दिला. ते वाळूज परिसरात जवळपास तीन वर्ष राहिले. मात्र पतीसोबत राहण्याची इच्छा नसल्यानं तिनं प्रियकरासोबत पळून जाणं पसंत केलं. त्यानंतर प्रियकरासोबत ती 'लिव्ह इन रिलेशन'मध्ये राहू लागली. त्यात त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी झाली. सध्या मुलाचं वय १३ वर्षे तर मुलीचे वय ६ वर्षे आहे. सहा ते सात वर्ष ती प्रियकरासोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये राहिली. मात्र दरम्यान प्रियकराच्या तीन भावंडांनी वेगवेगळ्या वेळी तिच्यावर धाक दाखवत अत्याचार केल्याचा आरोप तिनं तक्रारीत नोंदवला.

चार जणांनी केला अत्याचार : काही वर्ष प्रियकरासोबत राहिल्यानंतर पीडिता काही वर्ष कुटुंबीयांसोबत एकत्रित देखील राहिली. त्यावेळी दोन भाऊ आणि चुलत भाऊ यांनी धाक दाखवत पीडितेवर अत्याचार केला. २०२४ मध्ये मोठ्या दीरानं तिच्या लहान मुलीला जवळ घेत अील चाळे केले. तिला वाचवायचं असेल तर माझ्यासोबत संबंध कर असा त्यानं धाक दाखवला. कुटुंबीयांना आणि नवऱ्याला सोडून इकडं आल्यानं कोणालाही अत्याचाराबाबत सांगू शकले नाही. लहान मुलीवर वाईट नजर टाकल्यानं अखेर तक्रार दिल्याचं पीडित महिलेनं सांगितलं. ''वाळूज पोलीस ठाण्यात पीडितेनं तक्रार दिल्यानंतर चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास करत आहोत,'' अशी माहिती वाळूज पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामेश्वर गाढे यांनी दिली.

### आई–वडिलांना घराबाहेर काढणाऱ्यांनो सावधान! कोणतंही खर्च न करता ज्येष्ठ नागरिकांना आता मिळणार न्याय

पुणे ४ एप्रिल (पीएसआय)

सध्या शहरात गेल्या अनेक वर्षापासून जीवनशैली बदलल्याचं पाहायला मिळतंय. मुलं विदेशात शिक्षण घेतात आणि आई–वडील शहरात राहतात आणि मग लग्न झाल्यावर ते परत शहरात येतात, तर काही लोक हे एकत्र राहत असतात. लग्न झाल्यावर अनेक मुलं हे आपल्या आई–वडिलांना वृद्धाश्रम किंवा घराबाहेर काढण्याच्या घटना समोर येत आहेत. असं असताना आई–वडिलांच्या नावावर घर असतानादेखील वृद्ध आई–वडिलांना घराबाहेर जावं लागतं. मात्र आता अशा घराबाहेर केलेल्या आई–वडिलांना निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून मदत करून त्यांना परत घर दिलं जाणार आहे.

मुलाविरोधात कोर्टात जावं का असे अनेक प्रश्न : मुलांकडून आई वडिलांना घराबाहेर केल्यावर घर नावावर असतानादेखील आपण काय करावं, कोर्टात जावं का असे अनेक प्रश्न या ज्येष्ठ नागरिकांमध्ये निर्माण होतात, पण आता या ज्येष्ठ नागरिकांना ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम २००७' म्हणून ओळखले जाते, त्या कायद्याअंतर्गत मदत केली जाते. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम म्हणाल्या की, आपल्याकडे ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम, २००७' म्हणून ओळखले जाते, हा कायदा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे. हा कायदा असून, याच्यात ज्या व्यक्तींना मुलं त्रास देतात किंवा त्यांना घरातून बाहेर काढतात, तसेच मुलं म्हणून त्यांना कोणतीही मदत करत नाहीत, त्या अनुषंगाने आपल्याकडे ज्येष्ठ नागरिक अर्ज करू शकतात आणि त्यांनी अर्ज केल्यावर त्यांना अशा प्रकरणात मदत केली जाऊ शकते. ज्यात मुलांकडून पोडगी दिली जाऊ शकते किंवा त्या आई–वडिलांच्या नावाने घर असेल तर त्या मुलांना घराच्या बाहेर काढून त्या आई–वडिलांना घर मिळवून दिलं जाऊ शकतं, असंही यावेळी कदम म्हणाल्यात.

महिन्याला साधारणत: हा २० ते २५ केसेस : त्या पुढे म्हणाल्या की, पुणे शहरात अशी प्रकरणे ही खूप वाढत असून, महिन्याला साधारणत: हा २० ते २५ केसेस या आमच्याकडे येत असतात आणि हा कायदा ज्येष्ठ नागरिकांसाठी असल्याने अशा प्रकरणात फक्त एका अर्जावर ज्येष्ठ नागरिकांना मदतही केली जाते. आज आमच्याकडे अशी प्रकरणे येत असतात, ज्यात पत्नीच्या सांगण्यावरून मुलं आपल्या आई–वडिलांना त्यांच्याच घरातून बाहेर काढतात. पण कायद्यानुसार, आई–वडिलांच्या नावावर घर असताना मुलं त्यांना बाहेर काढू शकत नाही. जानेवारीपासून आतापर्यंत कायद्याचा योग्य वापर करून ४२ ज्येष्ठ्यांच्या बाजूनं निर्णय घेऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू परत आणण्यात आलंय. सध्या शहरात अशा पद्धतीने आई वडिलांना घराबाहेर काढण्याचे प्रमाण हे खूप वाढतंय. ग्रामीण भागात हे प्रमाण खूपच कमी आहे. ज्या आई वडिलांना त्यांच्या स्वत: च्या नावावर जर घर असेल आणि त्यांच्या मुलांनी बाहेर काढलं असेल, त्यानं आमच्याकडे एक अर्ज करावं, त्यांना या कायद्याच्या अंतर्गत मदत केली जाणार असल्याचं यावेळी कदम यांनी म्हटलंय.

ते सन्मानाने आयुष्य जगू शकतील : ज्येष्ठ नागरिक निर्वाह कायदा, ज्याला 'आई–वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह आणि कल्याण अधिनियम, २००७' म्हणून ओळखले जाते, हा कायदा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे, जेणेकरून ते सन्मानाने आयुष्य जगू शकतील. या कायद्याअंतर्गत येणारी प्रकरणे ही आई, वडील आणि मुलगा– सून विरोधातील असतात. यावेळी निर्णय देताना सध्याची स्थिती लक्षात घ्यावी लागते. जानेवारीपासून ते आजपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यातील ४२ प्रकरणात निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी निर्णय दिला असून, हा सर्व निर्णय ज्येष्ठांच्या बाजूने देण्यात आलाय. तसेच आई–वडिलांनी मुलांना संपत्ती बक्षीस पत्राद्वारे दिलेली असते. परंतु कालांतराने त्यांना ते पोसत नाहीत किंवा त्यांना घराबाहेर काढतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक हवालदिल होत आहेत, त्याला कायद्याच्या चौकटीत राहून त्याला न्याय दिला जाते.

### साई आश्रम निवासस्थानात सीआयएसएफ यंत्रणेचा मुक्काम; साई संस्थानच्या निर्णयावर भक्तांची नाराजी

शिर्डी ४ एप्रिल (पीएसआय)

शिर्डी साई संस्थाननं निमगाव हद्दीतील साई आश्रम फेज दोन मधील ण इमारत 'केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल'च्या (ण्घ्एइ) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली आहे. ११ महिन्यांचा करार करुन प्रती खाट २० रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग सेवा सुरू झाल्यानं अतिरिक्त सुरक्षा दलाची कुमक मागवण्यात आलीय. सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी ही सुविधा देण्यात आल्याचं साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी स्पष्ट केलंय.

साई आश्रमात केवळ भाविकांनाच निवास मिळावा : साई संस्थानच्या निवास व्यवस्था या साईभक्तांच्या दानातून उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळं या ठिकाणी केवळ भाविकांचीच निवास व्यवस्था व्हावी, अशी मागणी होत आहे. रामनवमी उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येणार असून त्यांची निवास व्यवस्था अपुरी पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी निवास सुविधा देणे भाविकांसाठी गैरसोयीचं आणि पवित्रतेच्या दृष्टीकोनातून चुकीचं असल्याचं साई संस्थानचे माजी विश्वस्त सचिन तांबे यांनी म्हटलंय.

भाविकांची गैरसोय? : यासंदर्भात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना शिर्डीचे माजी नगरसेवक सुरेश आरणे यांनी, ''सध्या साई आश्रम फेज दोन मधील ण इमारत 'सीआयएसएफ'च्या (ण्घ्एइ) ताब्यात देण्यात आली आहे. भविष्यात इतर यंत्रणाही कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी साई संस्थानकडं मागणी करू लागल्यास भाविकांच्या गैरसोयीचा पायंडा पडू शकतो. त्यामुळं साई भक्तांच्या दानातून उभारलेल्या निवास व्यवस्थेचा उपयोग केवळ साईभक्तांसाठीच करावा, '' अशी भूमिका मांडली.

दानशूर साईभक्तानं व्यक्त केली नाराजी : चेन्नई येथील दानशूर साईभक्त के.व्ही. रमाणी यांनी एक अब्जाहून अधिक खर्च करत साई संस्थानला साई आश्रम एक आणि साई आश्रम दोन असे भक्त निवास शिर्डीत बांधून दिले. शिर्डीला येणाऱ्या भाविकांच्या राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी हे भक्त निवास बांधून देण्यात आलं असल्याचं के.व्ही.रमाणी यांनी सांगितलं होतं. तसंच यासंदर्भात तयार करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये, साई आश्रम भक्त निवास फक्त भाविकांसाठीच वापरण्यात यावे असं नमूद करण्यात आलंय. दरम्यान, साई संस्थाननं भक्त निवासातील एक इमारत ण्घ्एइ कर्मचाऱ्यांना भाडेतत्त्वावर दिली असल्याची माहिती दानशूर भाविकाला समजताच त्यांनी आपली नाराजी व्यक्त केलीय. तसंच ''संस्थाननं करारनामा एकदा पहावा, '' असंही के.व्ही. रमाणी म्हणालेत.

### शहाजी बापू पाटील यांनी भर सभेत स्वत:च्या तोंडात चापट मारून घेतली अन् पिकला एकच हशा, नेमकं काय घडलं?

मुंबई ४ एप्रिल (पीएसआय)

शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा माजी आमदार शहाजी बापू पाटील हे त्यांच्या विधानामुळे कायमच चर्चेत असतात. राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जेव्हा बंडखोरी केली होती, तेव्हा त्यांच्याबरोबर शहाजी बापू पाटील हे देखील होते. तेव्हा गुवाहाटीतील एक डायलॉगमुळे शहाजी बापू पाटील चर्चेत आले होते. 'काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेलष्ठ', त्यांचा हा डायलॉग राज्यभरात गाजला होता. यानंतर आता शहाजी बापू पाटील हे त्यांच्या एका कृतीमुळे पुन्हा एकदा चांगलेच चर्चेत आले आहेत.

माजी आमदार शहाजी बापू पाटील हे एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी शहाजी बापू पाटील यांनी भर सभेत स्वत:च्याच तोंडात मारून घेतल्याचं पाहायला मिळालं. त्यांच्या या कृतीने सभेत चांगलाच हशा पिकला होता. त्यांचा स्वत:च्याच तोंडात मारून घेतानाचा हा व्हिडीओही व्हायरल होत आहे. दरम्यान, माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी स्वत:च्याच तोंडात मारून घेतलं तेव्हा व्यासपीठावर सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह काही नेते देखील उपस्थित होते.

शहाजी बापू पाटील काय म्हणाले?

''ज्यांनी पाणी आडवण्याचं काम केलं, त्यांना तुम्ही खासदार म्हणून संसदेत पाठवलं. पण ज्यांनी तुम्हाला पाणी दिलं, त्यांना तुम्ही घरी बसवलं. त्यामुळे आपल्याला देखील काहीतरी वाटायला पाहिजे, आपल्या या चुकीमुळे आपण तोंडात मारून घ्यायला पाहिजे'', असं म्हणत शहाजी बापू पाटील यांनी भरसभेत स्वत:च्या तोंडात मारून घेतलं. शहाजी बापू पाटील यांच्या या कृतीवर सभेत एकच हशा पिकल्याचं पाहायला मिळालं.

'ही गोष्ट माझ्या काळजाला लागली'

सांगोल्यातील पाण्याच्या मुद्यावर बोलताना शहाजी बापू पाटील म्हणाले की, ''काय माणसं आहोत आपण? आपण काय केलं? ज्यांनी पाणी आडवलं त्यांना खासदार केलं आणि पाण्याशाठी ज्यांनी काम केलं, त्यांना घरी बसवलं. ही गोष्ट आपल्या काळजाला लागली'', असं म्हणत शहाजी बापू पाटील यांनी लोकसभेच्या निवडणुकीतील माढा लोकसभा मतदारसंघाचा संदर्भ दिला. लोकसभेच्या निवडणुकीत माढा लोकसभा मतदारसंघामधून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील हे निवडून आले, तर रणजित नाईक–निंबाळकर यांचा पराभव झाला. यावरूनच शहाजी बापू पाटील यांनी हे भाष्य केलं. 'तसेच आरडून ओरडून प्रश्न सुटत नाहीत. जनतेच्या विकासाची कामे करायची असतील तर सत्तेच्या जवळ असलं पाहिजे', असंही मत शहाजी बापू पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं.

### तब्बल १७ राज्यांमध्ये वादळाचा इशारा, झारखंडमध्ये गारपीट; हैदराबादमध्ये तब्बल ९१ मिमी पाऊस, चारमिनारचे प्लास्टर उखडले; कर्नाटकच्या तापमानात ७.५ अंशांची घसरण

नवी दिल्ली ४ एप्रिल (पीएसआय)

हवामान खात्याने महाराष्ट्र, बिहार आणि छत्तीसगडसह १७ राज्यांमध्ये वादळ आणि जोरदार वाऱ्याचा इशारा जारी केला आहे. झारखंडमध्ये गारांसह पाऊस पडू शकतो. याशिवाय देशाच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. गुजरातमध्ये उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहू शकते. दुसरीकडे, काल कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या विविध भागात पाऊस झाला. पावसानंतर कर्नाटकच्या कमाल तापमानात ७.५ अंशांपर्यंत घसरण झाली. इकडे राजस्थानमध्ये वादळ आणि पाऊस पाहायला मिळाला. मात्र, बाडमेर आणि जैसलमेर भागात उष्णता वाढू लागली आहे.

हवामान खात्याने महाराष्ट्र, बिहार आणि छत्तीसगडसह १७ राज्यांमध्ये वादळ आणि जोरदार वाऱ्याचा इशारा जारी केला आहे. झारखंडमध्ये गारांसह पाऊस पडू शकतो. याशिवाय देशाच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. गुजरातमध्ये उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहू शकते. दुसरीकडे, काल कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या विविध भागात पाऊस झाला. पावसानंतर कर्नाटकच्या कमाल तापमानात ७.५ अंशांपर्यंत घसरण झाली. इकडे राजस्थानमध्ये वादळ आणि पाऊस पाहायला मिळाला. मात्र, बाडमेर आणि जैसलमेर भागात उष्णता वाढू लागली आहे.

दुसरीकडे, महाराष्ट्रात कडक उष्मा आहे, तर दुसरीकडे हवामान खात्याने हवामानात अचानक बदल होण्याचा इशारा दिला आहे. मराठवाडा आणि विदर्भात तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. दरम्यान, राज्याच्या अनेक भागात मुसळधार पाऊस, मेघगर्जनेसह गारपीट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपीट होत आहे. बुधवारी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस अवकाळी पावसाची शक्यता असून गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

महाराष्ट्रावर उष्मा, पाऊस, धुके आणि गारपिटीचा तिहेरी हल्ला

उष्मा, पाऊस, धुके आणि गारपिटीचा तिहेरी हल्ला महाराष्ट्रावर होत आहे. वाढत्या तापमानामुळे विदर्भ–मराठवाड्यातील अनेक भागात उष्णतेसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, तर दुसरीकडे पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी रब्बी हंगामातील पिके काढणीसाठी तयार आहेत, मात्र अचानक वादळ, पाऊस आणि गारपिटीमुळे मोठे नुकसान होत आहे. मध्य महाराष्ट्रात चक्री वारे तयार झाले असून त्यामुळे येत्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वारे आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, सातारा, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यांत मेघगर्जनेसह वादळी वारे व गारपीट होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन हवामान खात्याने १५ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट (सावधान रहा) जारी केला आहे, तर राज्याच्या इतर भागात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### शिवरायांबद्दल अवमानजनक वक्तव्य, कायदा होणार, तारीख ठरली; गृहमंत्री अमित शाह रायगडावरुन घोषणा करणार

सातारा ४ एप्रिल (पीएसआय)

राज्यात गेल्या काही महिन्यांत महापुरुषांबद्दल अवमानजनक वक्तव केल्यावरुन राज्यभर संतापाची लाट पसरली होती. अभिनेता राहुल सोलापूरकर आणि तथाकथीत पत्रकार प्रशांत कोरटकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बेताल वक्तव्य केल्यानंतर शिवभक्तांनी त्यांच्यावर कारवाईची मागणी केली. त्यानंतर, या दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रशांत कोरटकर सध्या तुरुंगात आहे. मात्र, या घटनांवरुन सातत्याने तीव्र संताप होत असून छत्रपती घराण्यांचे वंशज उदयनराजे भोसले यांनीही यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. शिवाजी महाराजांबद्दल सातत्याने अवमानजनक वक्तव्य करणाऱ्यांना चाप बसवण्यासाठी यासंदर्भात कायदा करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली होती. आता, लवकरच यासंदर्भात कायदा होणार असून स्वत: गृहमंत्री अमित शाह याची घोषणा करतील, असे खासदार उदयनराजे भोसले यांनी म्हटलं आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार होणाऱ्या अवमानावरून भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी काही दिवसांपूर्वी राज्य सरकारला घरचा आहेर दिला. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वारंवार आक्षेपार्ह विधाने केली जातात, या मुद्यांवर बोलताना सरकार काय बोळ्याने दूध पितं का? असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला होता. तसेच सर्व पक्षातील लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन एक विशेष अधिवेशन बोलवावं आणि तात्काळ कायदा पारित करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली होती. तत्पूर्वी गृहमंत्री अमित शाह यांचीही त्यांनी भेट घेतली होती. आता, याबाबत त्यांनी माहिती देत रायगडावरुन या कायद्याची घोषणा होऊ शकते, असे म्हटले आहे.

या महिन्यात १२ तारखेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त किल्ले रायगडावर गृहमंत्री अमित शहा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातून घोषणा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांच्या विरोधात मी जी इच्छा व्यक्त केली होती, त्या कायद्याची घोषणा झाली तर याला वेगळं महत्व प्राप्त होईल, असे उदयनराजे भोसले यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, १२ तारखेला अमित शाह रायगडावरुन या कायद्यासंदर्भात घोषणा करतील का, हे पाहावे लागेल.

अजामिनपात्र कायदा करावा

राज्य शासनाने तज्ज्ञांशी विचारविमर्श करुन, ऐतिहासिक दस्तावेजांचा योग्य अर्थ लावून, यापूर्वीच शिवछत्रपतींसह मराठा साम्राज्याचा शासनमान्य साधार इतिहास प्रसिध्द करणे गरजेचे होते. आज विकृत प्रवृत्ती असलेली व्यक्ती, त्याला जसे समजले, वाटते आहे अश्या पध्दतीने इतिहासातील प्रसंगाचे वर्णन करुन अकारण विवाद निर्माण करतो. अश्या प्रवृत्तींमुळे समाजामध्ये दुही पसरतेच परंतु राज्यातील देशातील कायदा आणि सुव्यवस्था देखिल बिघडते. शेजारी राहणाऱ्यांची मने कुलूषित होतात आणि त्याचे दिर्घ परिणाम समाजाला भोगावे लागतात ही वस्तुस्थिती आहे. आमच्या संयमाचा कडेलोट होण्यापूर्वीच राज्य व केंद्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि एकंदरीत मराठा साम्राज्याचा इतिहास अधिकृतपणे प्रसिध्द करावा त्याचबरोबरीने अश्या प्रवृत्तींच्या बाबतीत कायदेशीर कारवाई करता येणारा तसेच किमान १० वर्षाची शिक्षा असणारा अजामिनपात्र विशेष कायदा पारित करावा, अशी मागणीही उदयनराजेंनी निवेदनाद्वारे अमित शाह यांच्याकडे केली आहे.

### छ. शिवाजी महाराजांनी जो न्याय दिला असता, तसाच न्याय देशमुख कुटुंबाला मिळेल, योगेश कदम यांचा मस्साजोगमध्ये शब्द!

बीड४ एप्रिल (पीएसआय)

जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या न्यायालयीन सुनावणीला सुरुवात झाली असून देखील अद्याप आरोपी कृष्णा आंधळे हा पोलिसांना सापडला नाही. तर, दुसरीकडे आरोपी वाल्मिक कराडसह इतर आरोपींची पोलिसांकडून बडखास्त केली जात असल्याचा आरोप देशमुख कुटुबीयांकडून व आमदार सुरेश धस यांच्याकडून होत आहे. त्यामुळे, याप्रकरणी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची बदली करावी, त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणीही केली जात आहे. त्यातच, आज गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मस्साजोग गावात जाऊन देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. संतोष देशमुख खून प्रकरणाच्या तपासासंदर्भात देशमुख कुटुंबाशी त्यांनी संवाद साधला. यावेळी, धनंजय देशमुख आणि संतोष देशमुख यांची कन्या वैभवी यांनी योगेश कदम यांच्याशी चर्चा करत काही महत्त्वाची माहिती दिली. तसेच, संबंधित प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांचा अद्यापही हस्तक्षेप असल्याचं गृहमंर्त्याच्या निदर्शनास आणून दिले.

योगेश कदम पहिल्यांदाच मस्साजोग गावात गेल्याने गावकऱ्यांनी संपूर्ण घटनेची माहिती गृहराज्यमंर्त्याना दिली. आरोपीची गाडी वाशीकडे जात असताना ही माहिती पोलिसांना सांगून देखील याकडे दुर्लक्ष केले गेले. वाशी पोलीस स्टेशनचे पी.आय आणि केजचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांना सह आरोपी केले पाहिजे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली. त्यानंतर, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करा असे सूचना योगेश कदम दिल्या असून ज्यांच्यावर शंका आहे त्यां अधिकाऱ्यांना माफ केले जाणार नाही, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला.

संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने देखील शंका असलेल्यांना सह आरोपी करण्याची मागणी कदम यांच्याकडे केली आहे. त्यावर, ज्यांनी सहकार्य केले त्यांना कडक शिक्षा